म ग्रं ठाणे
विषय : काव्य
स. क्र. २४५६९



ही वाट
उंच अलिप्त
आभाळाची
घनदाट मौनाची
निःशब्दाची या वाटेवर
माझ्या शब्दांचे थवे ...
उडून गेले पावले हलकी झाली.

हलकी झाली. ही वाट उंच, अलिप्त आभाळाची.
घनदाट मौनाची. निःशब्दाची. या वाटेवर माझ्या
शब्दांचे थवे उडून गेले. पावले हलकी झाली. ही

# गर्भरेशीम

## इंदिरा

REFBK-0023565
REFBK-0023565

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २४५६
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४५६
२३५६५
काव्य ५७७२
संद. शाखा (स्थळ प्रत)

संदर्भ काव्य
२७५६
२३५६५
२/७/८२

# गर्भरश्मि

नवसाहित्य
प्रकाशन

# गभिइशिम

इंदिरा

REFBK-0023565
REFBK-0023565

प्रकाशन क्रं. अठ्ठावीस

प्रथम आवृत्ती पंचवीस जानेवारी एकोणीसशे ब्याऐंशी

प्रकाशिका सौ. आशा वि. जवळकर
नवसाहित्य प्रकाशन
समादेवी रस्ता, बेळगाव.

सर्वहक्क सौ. वीणा रविन्द्र सन्त
२७, राणी रमाबाई कॉलनी
वडगाव, बेळगाव.

मुखपृष्ठ व
आतील रेखाचित्रे वासंती मुझुमदार
६९, विष्णुप्रसाद रानडे रोड,
शिवाजी पार्क, दादर मुंबई–२८

मुखपृष्ठ छपाई मौज प्रिन्टिंग प्रेस
खटाववाडी, मुंबई–४

मुद्रक सय्यद ए. कडोलकर
ब्ल्यू प्रिन्टर्स, दरबार गल्ली, बेळगाव.

मुल्य अठ्ठावीस रूपये

प्रकाश, पुष्पा आणि रवि
या माझ्या गुणवंत मुलांना
अर्पण—

## निवेदन

एकोणीसशे सत्तर साली माझा ' बाहुल्या ' हा कवितासंग्रह मौज प्रकाशनातर्फे प्रसिद्ध झाला.

त्यानंतरच्या दहा वर्षांतील कवितांचा हा संग्रह आता प्रकाशित होत आहे. यातील कविता कालक्रमानुसार घेतलेल्या आहेत आणि लेखनात जुने शुद्धलेखन वापरले आहे.

हा संग्रह येथील नवसाहित्य प्रकाशनातर्फे प्रसिद्ध होत आहे. कर्नाटकातील ही एक, एकमेव आणि अभिजात अशी मराठी प्रकाशनसंस्था. श्री. ए. कृ. जवळकर आणि त्यांचे बंधू यांचे पुस्तकांचे दुकान हे बेळगावातील वाचनप्रेमी लोकांना तीर्थक्षेत्रासारखे वाटते. त्याला जवळकरबंधूंचा उत्साह त्यांचे अगत्य आणि त्यांचे परिश्रम हे कारणीभूत झाले आहेत. त्यांचीच ही प्रकाशनसंस्था.

गेल्या सहा वर्षांपासून जवळकरबंधू माझ्याकडे 'तुमच्या कवितांचे प्रकाशन आम्हाला द्या', असा आग्रह धरून होते. निरनिराळ्या अडचणींमुळे हस्तलिखित तयार करून देणे मला जमत नव्हते. पण त्यांनी माझ्या अडचणी समजून घेतल्या. वाट पाहिली. भेटले की, आठवण देत, " बाई, वह्या देणार ना ? "

शेवटी गेल्या फेब्रुवारीत बोलता बोलता ते म्हणाले, "तुमच्यासाठी कागदही घेऊन ठेवला आहे." आणि मला ओशाळवाणे वाटले. मी लगेच कविता एकत्र लिहायला घेतल्या. पण कविता निवडणे, शुद्धलेखन पाहणे, अक्षरदोष, वृत्तदोष सुधारणे मुद्रिते तपासणे ही सगळी छपाईप्रत करून देण्यापासून पुस्तकप्रत तयार होईपर्यंतची उस्तवारी माझ्या त्यावेळच्या अधू प्रवृत्तीला झेपणारी नव्हती.

मी कशाबशा दोन महिने लावून वह्या लिहिल्या आणि पुढचे जिकिरीचे काम कविवर्य कृ. ब. निकुम्ब यांनी आपण होऊन स्वीकारले. शेवटपर्यंत स्वीकारले. माझ्या आठ-दहा ओळींच्या कवितेंत त्यांनी नव्याने दिलेले अनुस्वार आणि विराम मी पाहिले आणि हतबुद्ध झाले. जवळजवळ पुनर्लेखनच ! पण त्यांनी तो त्रास मानला नाही, हे त्यांचे मोठेपण.

आजवरच्या कवितासंग्रहांना मी त्यातील कवितेचेच नाव देऊन मोकळी झाले. पण या कवितांत असा मथळाच दिसेना. नाव ठरविणे हे काम मोठे कठीण ! हे का ते, ते का हे करायला लावणारे ! पण त्याच सुमारला गोव्याचे कवी श्री. शंकर रामाणी टिळकवाडीतील आपल्या सासुरवाडीला आले होते. त्यांची लीलाताई माझ्या जुन्याच परिचयाची. सहज भेटायला दोघे आले आणि जाताना वह्या घेऊन गेले. "तुम्ही नका त्रास घेऊ. मी यादी करून आणतो. तुम्ही फक्त निवडा," म्हणाले.

सात आठ दिवसांनी ते जोडपे एक यादी घेऊन यायचे आणि सगळी निकालात निघायची. शेवटी एकदा त्यांनी शेवटची म्हणून चार नावे आणली आणि त्यांतील 'गर्भरेशीम' हे नाव एकदम आम्हा सर्वांनाच आवडून गेले ! मग तेच पक्के केले.

कविता संग्रहाच्या मुखपृष्ठावरील आणि आतील रेखाचित्रे मुंबईच्या सुप्रसिद्ध चित्रकार आणि कवयित्री सौ. वासंती मुझुमदार यांनी तयार केली. आपले सर्व व्याप सांभाळून त्यांनी मोठ्या हौसेने काढली. तो त्यांचा हक्कच होता. प्रेमाने मिळविलेला.

या सुंदर मुखपृष्ठाची छपाई मौज प्रिंटिंग प्रेसमध्ये सुरेख झाली आहे. मुद्रणाचे श्रेय श्री. एस्. ए. कडोलकर यांचे.

या सर्वांच्या ऋणानुबंधाच्या धाग्यांनी हे 'गर्भरेशीम' साकार होत आहे. हा ऋणानुबंध, हे सहकार्य आभार, ऋण इत्यादी शब्दांनी व्यक्त करण्याच्या पार पलीकडचे !
म्हणून या सौहार्दाला माझे मनोमन नमस्कार. इतकेच.

हा संग्रह प्रकाशित होत असताना, मनात एक दाट उदासी भरून राहिली आहे :
आजवर माझ्या कवितांचे जाणकारीने मूल्यमापन करणारे सुज्ञ समीक्षक आणि माझे सन्मित्र श्री. माधव आचवल आज नाहीत.

आणि माझ्या कवितांचे नेहमीच मन भरून कौतुक करणारी माझी ताई– कमला फडके -हे पुस्तक पहायला आज नाही.
या दोघांच्या कौतुकाशिवाय ही कविता पोरकी राहणार आहे.

१ जानेवारी १९८२
२७, राणी रमाबाई कॉलनी, इंदिरा संत
वडगाव-बेळगाव ५९० ००५.

काव्यानुक्रम :


१ तुझ्या केतकी रंगांत : १३
२ अडाणी : १४
३ प्रळयाच्या पैल : १५
४ मऊ रेशमाची घडी : १६
५ डोंगरावरी गांव : १७
६ हौशीतरी किती प्रकारच्या : १९
७ भेट अटळ जी आहे : २०
८ कोवळीशी दीपकळी : २१
९ अंगणांत जुई : २२
१० राघूंचें झाड : २३
११ पाणी... पाणी... : २५
१२ संसार : २६
१३ उन्हावारियाची मूस : २७
१४ नियतीचें देणें : २८
१५ सतार : २९
१६ वाळवण : ३०

१७ भर बाजारांत : ३१
१८ वास येतां पराव्याचा : ३२
१९ जिथें चिमणी नाहीं : ३३
२० चार चौकांचें माहेर : ३५
२१ कुसुमकोश : ३६
२२ किती युगांची ही भेट : ३८
२३ मन कराया मोकळें : ३९
२४ ओझें : ४०
२५ धुक्यासारखा : ४१
२६ जशी तीं... : ४२
२७ शापित : ४३
२८ पदर भरून : ४४
२९ पिपळपानें : ४५
३० पाऊल तरी उचलूं कशी ? : ४६
३१ माहेराची वाट : ४७
३२ भाग्यवंता : ४८
३३ अधांतरीं : ४९
३४ गेलेलीं वर्षे : ५०
३५ यंत्राच्या त्या काचपाण्यांत : ५१
३६ चौरंगी बाजारपेठेंतील : ५२
३७ तें पाऊल : ५३
३८ मित्रमैत्रिणी जमतात तेव्हां... : ५४
३९ अंगणांत वृक्षवेली : ५५
४० चुकून चुकून : ५६
४१ दिशाहीन वाळवंटावरून : ५७
४२ खिडकीशीं बसून : ५८
४३ पानगळ : ५९
४४ त्याला परत यायचें नव्हतें : ६१
४५ आज इथें : ६२
४६ कांडण : ६३
४७ भूपाळी : ६४
४८ ही वाट : ६५
४९ तटस्थ : ६६

५० थेंब धारेचा होऊन : ६७
५१ निरोप : ६८
५२ जेव्हां भिंती स्तब्ध होतात : ६९
५३ भिन्न सावट दाटलें : ७०
५४ चाफळ : ७१
५५ किनारा : ७२
५६ ठाऊक नाहीं : ७३
५७ मनमग्न : ७४
५८ सदा कृतज्ञ : ७५
५९ शोध : ७६
६० सप्तपदी : ७७
६१ पाटी : ७८
६२ धिंगाणा : ७९
६३ सहज कुठें : ८०
६४ वजाबाकी : ८१
६५ निरोप घेऊन... : ८२
६६ रानवाटा : ८३
६७ केवढी ताकद हवी ? : ८४
६८ जेव्हां भ्यायचें : ८५
६९ आलोक : ८६
७० एक खेळ : ८७
७१ वळचळणीच्या पाखरानें : ८८
७२ नांदत्या घरीं : ८९
७३ झोप : ९०
७४ एक अडगळ : ९१
७५ अबोला : ९३
७६ त्या वेगळ्या जगांत : ९४
७७ शीळ : ९६
७८ कासावीस : ९७
७९ मोहरून आला आंबा : ९८
८० जेव्हां जेव्हां : ९९
८१ आला वसंत : १००
८२ किती राहून गेलेलें : १०१

८३ गुलमोहोर ; १०२
८४ कागदावर : १०३
८५ पाऊस कोसळतो : १०५
८६ गुंतलें .. : १०६
८७ बाळ गजराज : १०७
८८ देवस्थान : १०९
८९ सांगावा : ११०
९० दिनरातीच्या : १११
९१ सय : ११२
९२ नाही माझ्या चुलीपाशीं : ११३
९३ कडेलोटावर : ११४
९४ सुजाण : ११५
९५ धुमारे : ११६
९६ निवारा : ११७
९७ फांद्या झोकून रहावें : ११८
९८ मनावर : ११९
९९ तें एकटेपण : १२०
१०० केशराचा मळा (आम्रांचा) : १२१
१०१ दयाघन : १२३
१०२ वसंतवैभव : १२४
१०३ पिंपळ : १२६
१०४ संध्यातीर्थ : १२७
१०५ पुन्हां बाळपण : १२८
१०६ प्रवास : १२९
१०७ तरंग : १३०
१०८ डाळिंब : १३१
१०९ वाट थोडीशी उरली : १३२

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२७५६
क्र. २३५६५
ठाणे (स्थळ प्रत)

# गर्भरेशीम



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२०५६
ग्रं. क्र. २३५६५
काव्य २५०८
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

## तुझ्या केतकी रंगांत

तुझ्या केतकी रंगांत
 कसें दूध डहुळलें
काळचा तेजाळ डोळ्यांत
 लोणी मार्दवाचें आलें

शब्द मंजूळ घडले
 जसे सायसाखरेचे
वागणेही तृप्त संथ
 कसे धारोष्ण फेसाचे

मांडीवरी पितें बाळ
 गालीं दुधाचा ओघळ
अन्नपूर्णा तूं साक्षात
 दुग्धा म्हणू की सोज्ज्वळ

दूध आटीव केशरी
 कसें चांदीच्या वाटींत
तशी तुला पाहताना
 माझी लागेल का दृष्ट

## अडाणी

सहज सहज ऐटबाजपणें
     पदर कसा लपेटून घ्यावा
चालताना उजवें कोपर किंचित् तिरकस ठेवून
लयींत गोडवा कसा भरावा

रुसतां रुसतां हसून, मान कशी
तिरकी करावी
हसतां हसतां रुसून पापणी
कशी फुगवावी

हें सगळें
सगळ्याजणींनीं तुझ्यापासूनच शिकावें
इतकी तूं देखणी

पण बघ
अजून तुला घड्याळ कसें तें समजत नाहीं
अजून तुला
बोलतां कसें तें येत नाहीं
अगदीं सोप्या प्रश्नाचें
अगदीं सोपें उत्तर
तेंही कसें तें, तुला देतां येत नाहीं

हें सगळें
तुला कुणीतरी शिकवायला हवें
इतकी तू अडाणी.

## प्रळयाच्या पैल

देह भन्नाट सैरावैरा
    उठे तुफान काळजीचें
मन पिंजून तूस तूस
    बोंड फुटे सावरीचें

गेलें वाहून तन मन
    स्थिर येथें मी एकचित्त
प्रळयाच्या पैल तेथें
    हिरवा अंकुर पालवत

## मऊ रेशमाची घडी

अंगांत राघू-रंग
    लाल पदर जरीकाठ
मऊ रेशमाची घडी
    माझ्या अजून बासनांत.

ओवाळणी झाली
    झाली जन्माची दावेदार
घडी राहिली बासनांत
    आणि माहेर झालें दूर

भाऊबीजेची ओवाळणी
    भाऊ दावीत मोही दंग
उभी मानाची वहिनीबाई
    लाहृया फुटून झाली तंग

कानकोंडया झाल्या भिंती
    झळा गिळतां भ्यालें दार
गेला कोमेजून भाऊ
    भाऊ माझा तालेवार

किती दिवाळया येती-जाती
    भाऊबीज नाही होत
भावाची आठवण
    मुकी झाली बासनांत

## डोंगरावरीं गांव

डोंगरावरी गांव
वाट बिकट चढतीची
गळां दाटता बाळपण
ओढ लागते माहेराची

उन्हाळी तिन्हीसांज
कशी कोमट भारलेली
पायाखालीं वाट
अर्ध्यावरून अंधारली

मऊ वारा झीळमीळ
कळे श्वासा पापणीस
डोंगर गारव्याचा
आला दाटून उग्र वास

वेशींत लिंब चाफा
वाऱ्यावरती दरवळ
लक्ष्मीच्या राऊळीचें
त्यांत मिसळे दिपुष्टेल

दिवे लागले घरांतून
वास भाजका घरोटयाचा
शिऱ्याशेणीच्या विस्तवाचा
कुठे अचूक बाळंत्याचा

गाई गुरें गोठयाआड
दर्प गुरांचा वैरणीचा

गोडूस त्यांत येतो
    झुरमुरत्या धारोष्णाचा

गंधाळीच्या कुप्या
    कुप्या सांडल्या पाठोपाठ
गेलें वहात घरापाशी
    आणि उडाली सारी भ्रांत

गळां दाटतां बाळपण
    अशी मनोमनीं येते
उंबऱ्याची जागा
    जागा शिवून मागें येते

## *हौशी तरी किती प्रकारच्या*

हौशी तरी किती प्रकारच्या ... साध्यासुध्या
शहाण्या वेड्या. फिटलेल्या. न फिटलेल्या.
आणि आकांक्षा ... लहान मोठ्या
पु-या होऊन रुखरूख लावणाऱ्या
जवळ येऊन दूर जाणाऱ्या. स्वप्नासारख्या.
कष्टही किती आणि कसले. शरीराचे. मनाचे
रमविणारे दमविणारे.
आणि कंटाळा. तोही किती प्रकारचा.
कामाचा. श्रमाचा. एकटेपणाचा. गर्दीचा.
कधीं कधीं कंटाळयाचाही.

हें सगळें
ओलांडून ओलांडून यावें.
कुठें न गुंतावें. कुठें न हरवावें.
लाटांच्या पोटांतून ओठांतून हलकेंच
किनाऱ्याशीं यावें:

हलकें फूल व्हावें.
पाकळ्या गळून नुसते पराग उरावे.
परागही गळून नुसता गंध उरावा.

## *भेट अटळ जी आहे*

भेट अटळ जी आहे
    कोठें कशी ती होईल
येईल का अकस्मात
    किंवा देईल चाहूल

डोळा भिडेल डोळ्याशीं
    किंवा खालती झुकेल
हात होतील का पुढें
    देह खिळून राहील

काय होईल कळेना
    येते दाटूनिया रक्त
उगाच ही तगमग
    उगाच हा वेडा हट्ट.

## कोवळीशी दीपकळी

कोवळीशी दीपकळी
तेवताहे ओंजळींत
लाल लोभस तेजानें
झळाळले माझे हात

तळहातांत वाकले
तहानेले श्रांत डोळे
लववितां न पापणी
तेज आकंठ प्राशिलें

कणाकणांत चैतन्य
जीव बहरून आला
हृदयींच्या तरफांत
पुन्हां नाद झंकारला

## *अंगणात जुई*

अंगणांत जुई .....
जुईला बहर
तिच्यापाशीं पसरला पदर
पदरांत आलीं अगणित फुलें
पदराचेंच मग आभाळ झालें

आभाळ असें सावरताना
मीच जुईची पुनव झालें
जुई ... दाही दिशाभर
पौर्णिमेला आला बहर

आतां असा बहर तोलून
वाटेकडे डोळे लावून ...

## राघूंचें झाड

पहाटेचीं पहिलीं किरणें येऊन
टेकतात न टेकतात तोंच झाडांतून
उधळतें हिरवें चैतन्य. चैतन्याचे थेंब थेंब.
थव्यामागून थव्यानें उडतात राघू
टेकतात इकडे तिकडे. इथें तिथें.
सर्व संसारभर.

कोचाच्या पाठीवर, रेडियोवर.
कपबशी-चहादाणीवर. डाळ-तांदुळाच्या डब्यांवर.
गुरगुटून झोपलेल्या बाळाच्या उशीवर.
पलंगाच्या नक्षीदार कठड्यावर.
दारांतील झोपाळ्यावर.

एक पाय वर उचलून गिरक्या घेत
पंख नाचवीत सुरू होतात त्यांचे बोल
" राधा ये. कोच पूस.
राणी, रेडिओ लाव.
माई कुकर लाव.
अहो, उठा चहा झाला.
बाळ ऊठ उशीर झाला
या. या. नमस्कार. काका आले चहा कर. "

असे बोल भराभर. गोड गजबज दिवसभर.
घरभर राघू भिरभिरत असतात
दिवस मावळला तरी भानांत नसतात.

चंद्राचीं किरणें खिडक्या कौलारांतून उतरतात
आणि राघू थव्याथव्यानें सावकास
परतायला लागतात.
पानांच्या पापण्या करून वाट पाहणाऱ्या
झाडाच्या कुशींत विसावतात

डोळयांवर पापण्या ओढून त्यांची नाजूक
चिर्रकिर्र सुरू होते. त्या स्वप्नांतील बोलांची
हिरवी वीज अंगभर खेळवीत
झाड दंग होऊन जातें.

*पाणी .... पाणी ....*

वर कोऱ्या आभाळाची
भट्टी तापली तापली.
खाली लेकरांची माय
वारा पदरानें घाली.

वाऱ्याखालीं कसेबसें
उभें रोप जवारीचें
एक मलूल पोपटी
दोन सुकल्या पात्यांचे

उभी कोणाच्या दारांत
रांग भुकेल्या बाळांची
थाळा वाडगा घेऊन
अशी तिष्ठत केव्हांची

पोरक्या या अर्भकांना
एक पाणी कां मिळेना
उभा डोळ्यामधे थेंब
तो कां सुकून जाईना

## *संसार*

एक-एक करुनीया
संसार हा जोडलेला
किती चतुर देखणा
डाव सुघड मांडिला.

धातू-काच-लाकडाचें
जाणवे न वस्तूपण
कशी बाळें जोपासलीं
माय गांधारी होऊन

उंबरा हा ओलांडून
राजलक्ष्मी जी येईल
तिच्या चाहुलीनें होई
मन उगाच व्याकूळ

सोनसळच्या संसाराची
शीग तिच्या पायांपाशीं
टाकील का उलटून ?
लावील का हृदयाशीं ?

## उन्हावारियाची मूस

किती उठलीं वादळें
    किती सावट दाटलें
किती ताणले तणावे
    किती काहूर माजलें

किती सोसलें साहिलें
    किती टाकिलें गिळून
आतां त्याची न जाणीव
    नाहीं तीही आठवण

कात उलटून टाकिली
    मन मोकळें कोवळें
उन्हावारियाची मूस
    कशी वेल्हाळ सळसळे.

## नियतीचें देणें

बाळाच्या वाढदिवसा दिवशीं, त्याच्या आवडीचें
विमान घेण्यासाठीं, फक्त तीन रुपये ....
तेही बाजूला काढतां येत नाहीत. हा
रिकाम्या ओंजळीचा गुदमरून टाकणारा ताण
सोसला आहे.

सहज फूलपाखरासारखें झुलत झुलत
ओंजळीत येऊन उतरणारें विमानाचें तिकीट ....
हा भरल्या ओंजळीचा कासावीस करणारा ताण
सोसला आहे.

असें हें नियतीचे देणें. तन्मणी देण्याचा आव आणून
खोड ओंजळींत टाकून मोती ओघळून लावतें.
एक एक मोती वेचतां वेचतां
मोलाचें आयुष्य संपून जातें.

कधीं
तन्मणी देण्याचा आव आणून
ओंजळींत टाकतां टाकतां खोड तेवढेंच खुडून घेतें
आणि हातांतील पाणीदार मोत्यांना
मातीचें मोल येऊन जातें. असें हें नियतीचें देणें.

## सतार

जाळीदार झापणाखालीं
झुलत असलेला अतिमंद दिवा
सभोंवारच्या भिंतीवरून झुळझुळणाऱ्या
पाण्याच्या नाजूक लाटा— आराम खुर्चीवरील
अर्धोन्मीलित नेत्रांवर ग्लानीचें शिंपण करणाऱ्या.
कुठून तरी येणारा उदबत्तीचा दरवळ,
बळशावळशांनी गाभाऱ्यापर्यंत पोचविणारा.
सभोंवारच्या अंधारावर चढलेले गोड मौन.
आणि ती सतार ....

पंचप्राणांच्या स्पर्शानें होतात तिच्या तारा
पिवळ्याधमक बाभळींतून झरणाऱ्या चंद्रधारा.
तिच्या तरफा— गहन गूढ जलाशयावर
थरथरणारा वारा ....

कोसळतात एका मागून एक
सोनेरी पावसाच्या थेंबांचे घोस
पाण्यांतून उफाळतात निळसर धुक्याच्या ज्वाळा.
सळसळून डंखायला येतात सुगंधी नागिणी
आणि चराचराचें होऊन जातें एक
रत्नखचित आकाश,
नादब्रह्मावर झेपावलेलें.

## *वाळवण*

चंद्र-सूर्य-चांदण्यांचें
    कुणीं घातलें वाळवण
कणी टिपाया पाखरानें
    इथें पाखडिले प्राण

रेशमी बंध पायी
    पाय काचती बघवेना
रक्तबंबाळ माझीं बोटें
    कसें आवरूं आवरेना.

कुणी घातलें वाळवण
    राखणा कसा नाहीं
माझें पाखरूं फसणारें
    आतां माझ्यापाशीं नाहीं.

## *भर बाजारांत*

किती उन्हाळे पावसाळे
    कशी मोगरी कोमेजली
भरल्या बाजारांत
    बाळमैत्रीण ओळखली

डोळां नाचलें बालपण
    हात धरून थांबवली
तिची बाहुली दे ना साद
    कशी अवघड झाली.

कशाकशाचे आले पूर
    हात सुटले हातांतून
बाळपणींची फुलमाळ
    दूर चालली धारेंतून

## वास येतां पराव्याचा

हवा हाले ना तरीही
कशी डहाळी कापली
किट्ट काळोखांत तरी
कशी सावली दाटली

कुठें कुठें नाहीं कोणी
कशी चाहूल वेटाळे
वास येतां पराव्याचा
मन भिऊ-भिऊ झालें

उमगलें आहे सारें
सारे कोसळले ताण
फक्त काळजाचे डोळे
घट्ट राहिले मिटून

सूर्यनारायणा, उद्यां
नको येऊं वेडाकुडा
काय सांगावें कळेना
नको येऊं वेडाकुडा.

## जिथें चिमणी नाहीं

वेळेवर टेकलेल्या हिरव्या गर्द डोंगर-उतरणीनें
कडेवर घेतलेलें तें
घरकूल.

मागल्या दारानें, दूरवर चमचमणारें दर्यावरील
जरीकाम टुळूटुळू बघत हरवून जाणारें;
पुढील दारच्या खळयावरील रांगोळीवर
पागोळीचे चार खोडकर थेंब शितडणारें;
किट्ट काळोखांतील चाहुलीला घाबरणारें;
नारळीच्या कुशींत गुडुप करणारें;
सुरमय–सरंग्याच्या आस्वादानें बाळसें धरणारें;
सागरलहरींच्या लयदार आर्जवी स्वरांनीं बोलणारें
तें घरकूल.

तें जेव्हां सोडून निघालें तेव्हां समजलें
ही हळदीकुंकवानें रेखलेली उंबऱ्याची घाटी
चढून जाणें किती अवघड.
मी घुटमळत असतें. तें सांगत असतें:
पुन्हां येशील तेव्हां माझ्यासाठीं
घेऊन ये
एक टायवाला गुबगुबीत चिमणा.
एक उंच मानेची तुरतुरीत चिमणी.
तीं मग केळीच्या बागेंत लपंडाव खेळतील
झावळयांवरून झोके घेतील.

फोटो–कपाटावरून भिरभिरतील
सारखीं चिवचिवत राहतील
वळचणीला छानसें घरटें बांधतील ..
घेऊन ये.

किती वेळ माझ्यामागून शब्द येत होते :
घेऊन ये.

## चार चौकांचें माहेर

चार चौकांचें माहेर
जेव्हां ओलांडून आलें
उपहासानें हासत
दरवाजे बंद झाले.

नाहीं पाहिलें वळून
नाहीं केली आठवण
सुखास्वप्नाच्या कोषांत
पुरी गेलें मीं मिटून

पाखरांचा की संसार
दिसाभर वणवण
एका खोलीचें घरटें
उभें विसावा घेऊन

एका खोलीचा संसार
पाळण्याची झाली दाटी
कुठें खेळेल रांगेल
मना लागली ओहटी

चार सोपे रांगायाला
खेळाखेळीला अंगण
माझी स्वाभिमानी मान
आज पडली मोडून

लेकराला कल्पवृक्ष
सुखादु:खाला मांडव
अशा माहेराला आज
आज आसूसला जीव.

## कुसुमकोश

तुझ्याबरोबर बिरड्या सोलल्या;
हिरव्या सारवणावर रांगोळ्या रेखल्या;
धुक्यांतून पावसांतून फिरलें;
ताज्या दुधाचा दाट चहा म्हणशील तेव्हां घेतला;
गर्दींत बावरलें, तुलाच कितीदां सावरलें;
सुखांत उजळलें; दुःखांत कोसळलें.
हा
बारीक-सारीक बुडकुल्यांचा खेळ...

तुझ्या हळदुल्या स्वप्नांनीं रेखलेल्या पाऊलखुणांवरून
आतां माझी साथ मागूं नको.
मला इथेंच थांबूं दे.
या भातुकलीच्या मांडणी-सजावटींतील वस्तू-वस्तूनें
मला बांधूं नको.
मला मोकळें होऊं दे.

पाऊल खुणांवरून
वणव्यासारखा पसरणारा हा उन्हाळा;
रंगदार भातुकलीला निष्पर्ण करणारा हा हिवाळा;
तुझ्या धावत येणाऱ्या डोळ्यांत भरून आलेला
हा पावसाळा; अडविण्यासाठीं पसरलेल्या
तुझ्या सुकुमार बाहूंतील हा वसंत
तुझ्या या ऋतुचक्रांत मला
गुंतवूं नको.

संगती संगतीने गुंफलेल्या कुसुमकोषांतून
मला अलगत जाऊं दे.
तुझ्या सहवासाचा सुगंध अंगाभोवतीं
घमघमतो आहे तोंवर
मला इथून जाऊं दे.

## *किती युगांची ही भेट*

किती युगांची ही भेट
    भेट डोळ्यांत लोटली
आणि क्षणार्धांत एका
    कशी दिसेनाशी झाली.

झालें सुजन स्वागत
    किती हासलों बोललों
टाळून त्या एकमेकां
    किती सहज वागलों

'किती सुरेख सुगंध
    छंद आहे का अजून ?'
'नाहीं अत्तर ना फूल
    गंध येईल कोठून ?'

गंध भरला छातींत
    येतो कुठून कळेना
जड शब्दांच्या स्पर्शानें
    पाणी डोळ्यांत मावेना

पाणी डोळ्यांत मावेना
    तरी डोळ्यांआड झालें
मानसींच्या धरित्रीनें
    आईपण धन्य केलें.

## *मन कराया मोकळें*

माझी आवड - नावड
    माझी स्वप्नें नि आकांक्षा
माझें सुख माझें दुःख
    माझ्या आशा नि निराशा

माझ्या प्रमत्त मोराचा
    असा पिसारा फुलतो
त्याच्या तोलांत तालांत
    मोर नाचतो झुलतो.

आज मोराचा पिसारा
    माझ्या मनांत मावेना
आणि त्याच्या नर्तनांत
    माझी जाणीव रमेना.

मन कराया मोकळें
    कसा पिसारा खुडावा?
जीवें भावें पाळलेला
    मोर कोठें उतरावा?

## ओझें

किती उन्हें वर आलीं, उठवलें तर उठत नाहीं.
घरांतला हा मोठा मुलगा, घरासारखें रहात नाहीं.

मला हाका मारूं नका. माझा चहा झाकून ठेवा.
माझी वाट पाहूं नका. माझें ताट वाढून ठेवा.
मनापासून वागत नाहीं.
वडीलधाऱ्यांत मिसळत नाहीं:
भावंडांत रमत नाहीं.
बारीकसारीक घरची कामें, याचा कांहींच संबंध नाहीं.

कांही विचारलें बोलत नसतो.
कांहीं सांगितलें उठून जातो.
दारांत स्कूटर फरफटते.
आला... गेला... एवढेंच कळतें.

ह्याच्या वेळीं,
दिवस राहिले. दिवस भरतां अवघडून गेलें.
अवघडणेंही असह्य झालें. कधीं सुटेन
हिशेबाचे क्षण क्षण मोजत राहिलें.

तशीच आज मनोमनीं
ओझ्यानें या अवघडून गेलें.
कधीं सुटेन हिशेबाचें गणित मात्र
हरवून बसलें.

## धुक्यासारखा

बोध-अबोधाच्या धुक्यांतून तो येत होता.
धुक्यासारखा.
त्याच्या हातांतील सुगंध माझ्यापाशीं येण्यापूर्वींच
तो उशागती आला.
मीं माझ्याशींच म्हणालें, 'कोण... आणि हीं फुलें...'

हातागतीं बसत एकेक फूल अंगभर वहात
तो म्हणत होता
'तुला. तुलाच म्हणून. तूं निघालीस म्हणून.'

त्या फुलांचा गार स्पर्श कणाकणांतूस झिरपत राहिला.
आणि त्या ओढभरल्या शब्दांची मंद्र गाज
रक्तांतून घुमत राहिली.

हें सगळें किती नवें. न अनुभवलेलें. आणि तूं
एक अपरिचित...

डोळ्यांतून कानाशिलावर घळणारें पाणी
फुलानें अडवीत तो म्हणाला 'अपरिचित—
छे ग. मी तर जन्माचा... ऋणानुबंधी'.

त्याच्याकडे बघतां बघतां धुकें कधींच
वितळून गेलें होतें.   तोहीं.
पण मी आता एकटी नव्हतें.

## *जशी ती....*

तो कधीं येईल, कधीं न येईल
कधीं भेटेल, कधीं न भेटेल.
कधीं लिहील, कधीं न लिहील.
कधीं आठवण काढील, कधीं न काढील
असा तो. एक अनिश्चिती...
बंदिस्त घड्याळांतील लंबकासारखी. मृत्यूसारखी.

त्या अनिश्चितीच्या ताणाच्या धाग्यांत
तिचे पाय गुंतणार. काचणार...
कोलमडणार...

पण तिनें त्या रंगदार धाग्यांचा एक
पीळदार गोफ केला. आणि त्याच्या झुल्यावर
उभी राहून ती झोके घेऊं लागली
या अस्मानापासून त्या अस्मानापर्यंत.
अशी ती. एक मुक्ता
वाऱ्यासारखी. जीवनासारखी.

## शापित

चार भिंतीचें घर. घराला चार खिडक्या.
दोन दरवाजे. पण बाहेर पडतां येत नाहीं.
दरवाजापाशीं गेलें कीं, उंबरा चढत चढत
चौकटीपर्यंत जातो.

मग काय करायचें? हें घास. तें पूस.
हें सजव, तें बदल. हें कर. तें कर. याचा
वीट आला की,
या खिडकींतून त्या खिडकीशीं. एकीपुढें
लेकुरवाळा फणस.
एकींपुढें तारांचें जंजाळ. तारांवरील थेंब. पक्षी.
एकीपुढें शेजारचा संसार.

यालाही डोळे विटलें कीं, पावलें टाकत रहायचें.
या भिंतीपासून त्या भिंतीपर्यंत.
सरळ रेषेंत. चौकोनाकृतींत. कर्ण साधून.

–वाटलें कीं, ही एका शापित राजकन्येची
गोष्ट होईल. कधी तरी राजकुमार येईल
तिची सुटका करील. पण किती आभाळें.
परतून गलीं तरी.
घोड्याच्या टापा कधींच ऐकूं येत नाहीत.
राजकन्या झोपींही जात नाहीं.

हळू हळू ...
खिडक्या नाहींशा होतात. भिंती निघून जातात.
पण फेऱ्या मात्र चालूच राहतात. सरळ रेषेंत.
चौकोनाकृतींत. कर्ण साधून.

## पदर भरून

झिमझिम पाऊस, आभाळ भरून.
शिरशिर गारवा, वाराभरून.
कातरवेळा, अंधारभरून.
मिणमिण दिवे, सावल्याभरून.

मुकें घर. दालन दालन.
मुकें तन. मुकें मन.
मुकें काहूर. इथून-तिथून.
मुका ताण पदर भरून.

## पिंपळपानें

पालवी पिंपळाला,    लाल लालस कोवळाली
बाळ मुकुंदाची काय,    लाख पावलें उमललीं.
कोंवळचा उन्हामध्ये,    लाल डहाली द्यावी–घ्यावी
डोळां कोवळी येतां प्रीत,    त्याच पानांत लपवावी.

पिंपळाचीं पानें,    दाट हिरवीं तेजाळतीं
घेतीं आभाळ खेळायाला,    वाऱ्यासंगत गाणें गातीं
जाळीच्या सावलींत,    पानें आपण गोंजारावीं
प्रीतीची कुजबूज,    त्यांना चोचींत भरवावी.

पिवळी पानगळ,    कसा पाऊस सोनियाचा
आणतो चोचींतून,    विजा टिपल्या आभाळाच्या
गडद संध्याकाळीं,    पानगळींत एकटी मी
आसूं टिपूनीया जावें,    आतां पिवळचा पाखरांनीं.

## पाऊल तरी उचलूं कशी ?

तूं माझी वाट पहातो आहेस. तिथूनच
निघण्याची घाई करतो आहेस ...

तशी मी घरांतून निघालें आहें.
दालना-दालनांतून यक्षिणींसारख्या विहरणाऱ्या
स्मृतींचा
"जातें मी" या एकाच वाक्यानें निरोप घेतला आहे.
काळजाच्या रंगीबेरंगी धाग्यांना तर
"येते मी"नें सहज तोडून टाकलें आहे.

पण या सागराच्या लाटा कमरेपर्यंत उसळत
येत आहेत.
पुढें पाऊल तरी टाकूं कशी ?
हा तुफान वारा डोळे देखील उघडूं देत नाहीं
तर ओचापदर आवरूं कशी ?
आभाळाच्या जंजाळांत गुंतून राहिलेल्या या
पदराच्या रेशमी दशा
सोडवून तरी घेऊं कशी ?

तूं घाई करतो आहेस. पण
पाऊल तरी उचलूं कशी ?

## माहेराची वाट

माहेराची वाट. तिच्यावर अंथरलेली
निळी मलमल अशी नाजूक की,
पिवळ्या चिमुकल्या पिसोळीनें जिच्यावरून
अलगद चालत जावें ...

अशी वाट. तरी माहेर किती जवळ.
डोळे उघडताच वेशीवरला कडुलिंब पावलांवर
मोहर ढाळतो. पापण्यावरून सुगंध फिरवतो.

अशा माहेरीं येतें म्हणताना, जिच्यासाठीं माहेर
तीच येते. मनभरून भेटते.
आपल्या चंद्रकोरींतील कुंकू माझ्या कपाळीं टेकते.
फळाफुलांनीं ओटी भरते. आशीर्वादाच्या अक्षता
भांगावर टाकते.

डबडबलेले डोळे सावरीत, हसतमुखशीं
नाहीशी होते. मी माहेरी येतें म्हणताना...

*भाग्यवंता*

भरांत उभी केळ
        गर्भरेशमी हिरवीगार
गर्द पोपटी पानाआड
        बाळ गोजिरें कडेवर

घड चालला पोसत
        मन आटत चाललें
घड पिवळा तेजाळे
        केळ ल्यायिली वल्कलें

बाळ चालला दिगंतीं
        केळ तृप्तींत मोडली
अशी भाग्यवंता आई
        एका केळींत भेटली.

*अधांतरीं*

सुसज्ज वास्तूच्या दालनादालनांतून
अधांतरीं फिरत राहिलें.
मृदुमुलायम गालिचे, रंगदार मांडणी
न कुठें पाऊल टेकलें. न कुठें बोट लागलें.
पंख नसतानाही अशी
संथ संथ तरंगत राहिलें बोंडांतून फुटलेल्या
सावरीसारखी,

असें तरंगताना, आभाळाचें निळेपण
डोळ्यांत भरलें. भरारा वारा पदरांत भरला. तरी
कडीपाटालगतच्या उन्हेरीच्या स्वच्छ प्रकाशांत
घुटमळत घुटमळत फिरत राहिलें. पंख मोडलेल्या
पाखरासारखी.

## गेलेलीं वर्षें

गेलेलीं वर्षें एकमेकांचीं. जाळीदार सावल्यांचीं
रंगदार उन्हांचीं. दाटलेल्या वादळाचीं.
धो-धो पावसांचीं

गेलेलीं वर्षें एकमेकांचीं. खेळीमेळीचीं.
घरकुलांतील भातुकलीचीं. फुगडीच्या रंगणाचीं
लिंबावरल्या झोपाळ्यांचीं.

गेलेलीं वर्षें एकमेकांचीं. कुठच्या कुठें...
पोचलेल्या पांखरांच्या घोळक्याचीं.

*यंत्राच्या त्या काचपाण्यांत*

एक चांगला फोटो. तर मग त्यासाठीं
गडद रंगाचें सुरेख पातळ. लक्ष-दुर्लक्ष असा
केसांवरून हात.
सगळेंच कसें कशाला कशाला झालें.
साखळी-कुडीच्या थाटामाटांत अवघडलें.
भुवईवरून हलकीशी पेन्सिल फिरताना संकोचलें.
कळत न कळत ओठ रेखताना थरकलें.
पोज देताना शहारून गेलें.

आपलें आपलें हें कौतुक. त्यानें मन भोवरा झालें.
पहिल्यांदाच साडी नेसलेल्या मुलीगत
बावरून भांबावून गेलें.

यंत्राच्या त्या काचपाण्यांत हीं सगळीं
पिसोळीं अभ्रें उतरायला हवीत.
त्या चित्राच्या छायाप्रकाशांत तीं सगळीं
लहरायला हवीत.

## चौरंगी बाजारपेठेंतील

चौरंगी बाजारपेठेंतील त्या भरचौकांत मधेंच
तें पाखरू असें कांहीं उतरलें...
उतरलें आणि त्याला कांहीं सुचेनासें झालें.
भेदरलेल्या डोळ्यांनीं असें असें टिपूं लागलें.

चारी बाजूंनीं अंगावर धावून येणारीं तीं
प्रचंड चाकें... त्यांचा प्रचंड घरघराट. त्यांतूनच
निसटून सैरावैरा धावणारे ते असंख्य पायच पाय...
त्याच्या पायांचें चिमुकलें त्रिशूल जमिनींत ठोकल्यासारखें
खिळून राहिलें.

वर तर आभाळाची धुरकट चिंचोळी पट्टी
फासेपारध्यानें पसरल्यासारखें तारांचें जंजाळ.
ओळीनें टपून असलेल्या इमारतींचे बहिरीससाणे
त्याचे पंख त्याच्या थरथरत्या अंगाला घट्ट चिकटले.
एक होऊन गेले.

चौरंगी बाजारपेठेंतील त्या भर चौकांत
तें पाखरू असें कांहीं उतरलें...
त्याचें पक्षीपणच त्याला सोडून गेलें.

## तें पाऊल

सुखांची चव घ्यायचें भान जागें झालें.
बेत आखले. खूप खरेदी.
मुलींना साड्या. मुलांना कापड. खेळणीं.
आवडत्या पुस्तकांनीं कपाट सजवायचें.
खूप नाटकें पहायचीं. ध्वनिमुद्रिका घ्यायच्या.
प्रवास करायचा.
मनाली... भूतान... श्रीलंका.

लिहिता लिहिता मांडीवर टेकलेल्या पावलावरून
सहज हात फिरला.
अंगठ्याच्या लसणाऱ्या सालानें डोळ्यांत
थेंब उभा राहिला.
पेन टाकून, असें थेंबाच्या काचेंतून त्याच्याकडे
प्रथमच पाहिलें.

नांगरलेला मलिन तळपाय. खोल कात्रे पडलेल्या टाचा
दुखणाऱ्या चिखल्या, सुजलेला घोटा नि
टपोरलेलीं बोटें... तें पाऊल
एक उपेक्षित गुलाम. सोशिक. निमूट.

याला मलम लावायला हवें. शेकायला हवें.
औषध घ्यायला हवें. याला सतत मऊशार
सपातांत ठेवायला हवें. पण आधीं हे
लसणारे साल कापून टाकायला हवें...

डोळ्यांतील थेंबाच्या आड हें सगळें
साचत असतानाच पुढ्यांतील
कागद करपून जात होता.

*मित्रमैत्रिणी जमतात तेव्हां . . .*

मित्रमैत्रिणी जमतात तेव्हां
प्राजक्तानें फुलें ढाळावीं, तशा ढळतात
संसारांतील गुजगोष्टी... सुखाच्या. दुःखाच्या.
गौरवाच्या. त्यागाच्या. त्याच्या आणि माझ्याही...

सगळे निघून जातात आणि मोकळा मोकळा
झालेला प्राजक्त अगदीं स्तब्ध उभा असतो
उरलेल्या मनगोष्टींच्या जाणिवेंत.
त्या शब्दात उतरत नाहीत अश्रूंत वितळत नाहीत.
त्या असतात काळजावरील डागण्या... त्यानेंच सोसलेल्या
आतां असतात फक्त वण.

पण असा बहर ढळून गेला कीं, त्यांचे
कडूजहर रस फांद्याफांद्यांतून जाणवतात
आणि प्राजक्त अगदीं स्तब्ध होऊन जातो.

### *अंगणांत वृक्षवेली*

अंगणांत वृक्षवेली,   झरे ऊन पानांतून
दारापर्यंत पोचली,   जाळीदार पखरण.
काम तसेंच टाकून,   उभी दाराशीं राहतें
छाया-प्रकाशाचीं फुलें,   डोळाभर साठवितें

अंगणांत वृक्षवेली,   मागें पश्चिम केशरी
पानाफांद्यांतून उभी,   उभी द्वारका दुसरी.
घरीं भरतो काळोख   नाहीं भान हें मनांत
तप्त सोनियाची धूळ,   मीही भरतें भांगांत.

येती वारियाच्या लाटा,   झिम्मा चालतो फांदीशीं
कधीं ढळावीत फुलें,   कधीं लवावीं मुळाशी
उभी राहून प्रसन्न,   त्यांचें झुलणें पाहातें
माझा झुलतो पदर,   मीही लयींत वाहतें

गूढ दाट अंधारांत,   उभ्या स्तब्ध वृक्षवेली
रंग निघूनिया गेले,   पानेंफुलेंही मिटलीं
त्याच अंधारांत उभें,   मन मिटून चाललें
तन विरून सुखानें,   चंदनाचें झाड झालें.

## चुकून-चुकून

चुकून चुकून कधींतरी डोळ्यांना डोळे
भेटले असतील. नसतील.
चुकून-चुकून कधींतरी चार शब्द
दिले घेतले असतील. नसतील...

चुकून-चुकूनमधले अचूक उभें करणारे-
असतील-नसतीलमधल्या क्षणाचें स्पंदन
स्थिर करणारें
एकामागून एक कवचें निखळून मनासारख्या
नितळ संगमरवराचें घडलेलें तें शिल्प...

त्याचें अस्तित्व हेंच सर्वस्व. जोखीम जपून ठेवयाची.
त्याचें दर्शन हीच शिक्षा. मुकेपणानें सोसायची.

## *दिशाहीन वाळवंटावरून*

दिशाहीन वाळवंटावरून सरकत जाणाऱ्या
या तुझ्या काळ्याकुट्ट लांब सावलीवरून
पावलें टाकत मी तुझ्यामागून
कितीं काळ चालत रहाणार आहें ?
किती लालगढूळ झळांचे सूर्योदय आणि
किती हिमशिल्पांचे चंद्रास्त...?

सावलीच्या त्या टोकाशी तूं केव्हां
दिसणार आहेस? त्या प्रखर उन्हाच्या
टेकडीवर? की त्या धुरकट दिसणाऱ्या पाचूच्या
बेटावर? की त्या झळझळणाऱ्या दूरवरच्या
मृगजळांत? की त्या गरगरणाऱ्या
प्रचंड भोवऱ्याच्या मध्यावर ?

तुझी ती काळीकुट्ट सावली माझ्या पायाखालून
निसटून तुझ्यांत कधीं साकार होणार आहे ?

## *खिडकीशीं बसून*

खिडकीशीं बसून, एकामागून एक
कबुतरें सोडायचीं दिगंतरावर... ओंजळींत धरून.
मनाच्या कणाकणाच्या पुड्या गळ्यांत बांधून.
आनंदाच्या. अभिनंदनाच्या. खुशालीच्या.
काळजीच्या. सांत्वनाच्या... जिथें-तिथें 'मी' च्या.

हा विश्वव्यापी पोरकटपणा
कधींतरी थांबायला हवा. खिडकी
नाहींशी व्हायला हवी. कुरतडलेल्या मनाचें
निळें-निळें आभाळ व्हायला हवें.

## पानगळ

अंगणांत पानगळ. पानावर पान.
पिवळें करडें रानच रान.
पायऱ्यावर धूळ. धुळीचे थर
पागोळींला लोंबतें कोळ्याचें घर.
दारावरून फिरतात पाली.
कुलुपावरती गंजाची लाली.

या घराची बाळमिठी
सोडून वर्षें झालीं किती
यांची सेवा. त्यांचा उद्धार
समाजाचें ऋण फार.
आदर्शांनीं ओढून नेलें
आयुष्याचें व्रत केलें.

हार, फोटो, पुतळे घडले
समाजानें ऋण फेडलें
तिच्या कठोर व्रतामधून
अलगद तिलाच दूर केलें.

अंगभर काटे रुतले.
काळजावर दगड ठेवले
डोळ्यांत एक आशा ठेवून
घरापाशीं पाय आले.
दूर झाडाखालीं राहून
घर बघतें प्राणभरून

पुढें पाऊल पडलें नाहीं
पानगळीच्या पावसाखालीं
खूण तिची उरली नाहीं.

## त्याला परत यायचें नव्हतें

मावळत्या सूर्याचीं किरणें अंगावर घेत
पायरीवर निश्चल बसून रहावें.
कुठें पाहूं नये, कांहीं ऐकूं नये. मन मात्र
मोकळें सोडावें. अगदीं मोकळें...
त्या चिमुकल्या पाखराला भराऱ्या घेताना तें
झिरीमिरी आभाळही अपुरें व्हावें. आणि आपण
ओघळून पडलेल्या पानासारखें
स्वस्थ निश्चित असावें.

उतरत्या काळोखाबरोबरच तें परत आलें.
परत आलें, सगळ्या देहांत दिवे उजळले. पण
ओंजळींत येऊनही त्यानें पंख गोळा केले नाहीत.
पायाचीं नखें लडिवाळपणें बोटांत अडकविलीं नाहीत
आणि अवचित
मिटत्या बोटांतून सुटून त्यानें अंधारांत सूर मारला.

मी वाऱ्यासारखी भर्रकन उभी राहिलें
घरांत दिवे उजळायच होते, अपुरें पत्र
पुरें करायचें होतें. सिबाला दूध, मासे
घालायचे होते. चालत्या पावलाशीं मांजर
घसटायला लागलें तरी सगळें कसें
पिठाची विरी गेल्यासारखें झालें.
कुठेंतरी ढग गच्च दाटून आले आणि
डोळ्यांतून टचाटचा पाणी फुटूं लागलें.

*आज इथें*

आज इथें... उद्यां तिथें... परवां आणखी कुठें...
अशीं हीं
सारखीं स्थलांतरें. निर्व्याज पाखरांसारखीं.

जिथें-तिथें वेगळी माती. वेगळा वारा.
वेगळीं उन्हें. वेगळ्याच पाऊसधारा
हें एकूण वेगवेगळेपण विजेसारखें
लखलखत जाणारें. रक्तांतून फिरणारें...

एकाच मातीच्या बुडकुल्यांत याचें मूळ धरत नाहीं.
याला कसें जपून धरावें... कळत नाहीं.

## *कांडण*

कुंकू भिजलें घामानें
        कानीं कुंडलें नाचतीं
वाक्या-काकणांचे हात
        दोन मुसळें तोलतीं.

घावामागूनिया घाव
        भरे कांडणाचा वारा
श्वास घुमती लयींत
        झाला विश्वाचा भोवरा.

चालें कशाचें कांडण
        घाव घालतात फक्त
माझें काळीज उखळ
        तेंही आतां शब्दमुक्त

## भूपाळी

कुणी जवळ उभें... ही चाहूल
काळजाला जाणवणारी. मन भरणारी.
खांद्यावर हाताचा दाब. हलकासा
आपलासा.
केसांवरून फिरलेली गार बोटें. प्रसन्न झुळुकीचीं
सुखाच्या शहाऱ्याचीं
परिचित.
कानाच्या पाळीपाशीं एक अस्फुट शब्द
नांवाचा. मंत्राचा...

पण सुखबधिर पापण्या उघडत नाहीत.
बंद पापण्यांत धुकें मिसळलेल्या चांदण्यावर
उमटत असतात या भूपाळ्या.
आणि त्यावर लहरत असतात या
फुलवंत डहाळ्या.

*ही वाट*

चर्चा विनोद. थट्टामस्करी. गप्पागजाली
यांची रमतगमतची वाट मागें टाकून
या वाटेला ... केव्हां वळलें समजलें नाहीं.

ही वाट मुग्ध हिरव्या कुरणांची उंच अलिप्त
आभाळाची. घनदाट मौनाची. निःशब्दाची
या वाटेवर माझ्या शब्दांचे थवेच्या उडून गेले...
पावलें हलकीं झालीं

सतारीच्या द्रुतलयींतील पड्यांसारखीं तीं
आतां जलद जलद पडायला लागतील...
त्या उसळणाऱ्या मौनकल्लोळांत तबल्यावर
हात केव्हां टेकला हें समजणारही नाही

## तटस्थ

दाराच्या भरक्कम चौकटीला टेकून मी
उभी असतें बघत
एक एक जीवनाचें पान ओघळताना...
अगदीं तटस्थ.

स्मरणें चाळवत नाहीत. डोळे चुरचुरत नाहीत.
कुठें कांहीं पोचतच नाहीं
संपूर्ण सुखानें सुस्तावलें असेन. सतत
दुभंगत जाणाऱ्या दुःखानें निढावलें असेन.
संवेदनाच लुळया पडल्या असतील. की
पाऊसपाण्याचे ओहळ जावेत तसेंच हें
वाटत असेल ?

कांहींच कळत नसल्यासारखी मी एक-एक
ओघळतें पान बघत उभी आहें.
अगदीं तटस्थ.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

## थेंब धारेचा होऊन

मेघ श्याम पालाणानें
    झाकोळला अवकाश
रेषा वाऱ्याची हलेना
    झिम्मा धरला पाऊस

संथ पावसाचे झोत
    पानपाऊस वरून
झाडावरती पाखरूं
    घट्ट फांदीला धरून

निथळते ओले पंख
    डोळे घेतले मिटून
कसें सामावून गेलें
    थेंब धारेचा होऊन.

## निरोप

हें लहानसेंच घर.
आंब्याफणसांच्या सावलीचें. समोर
झुलणाऱ्या बांबूचें. आल्या-गेल्याचें. पाहुण्यांचें.
मुलाबाळांचें. लाडक्या मुक्या प्राण्यांचें
आमचें दोघांचें.

कित्येक सुखाच्या लहरी याच्या भिंतींनीं
ध्वनिमुद्रित करून ठेवल्या असतील.
कित्येक दुडदुडणारीं पावलें याच्या जमिनीनें
वत्सलांच्छनासारखीं जपून ठेवलीं असतील.
कित्येक कोसळणाऱ्या क्षणांना याच्या
कौलारानें आधार दिला असेल,

भाजून काढणाऱ्या उन्हाच्या झळांतून
यानें मला दिलासा दिला आहे.
घोंघावत येणाऱ्या वादळांतून यानेंच मला
सावरलें आहे. खिडक्यांच्या गजांनीं
माझे अश्रू पुसले आहेत.

याला... सोडून निघताना माझें काळीज
वितळेल. आणि हें–
खिडक्या दारें मिटून भरल्या मनानें आशीर्वाद देत
मागेंच उभें राहील. आईसारखें.

## *जेव्हां भिंती स्तब्ध होतात*

जेव्हां भिंती स्तब्ध होतात. खिडक्या आकसून राहतात
आणि उघडीं दारें झाकोळून येतात, तेव्हां
त्यांमधून वावरणारीं अल्लड पावलें पळूं पळूं करतात.
कावरेबावरे डोळे लागून राहतात घड्याळाच्या काट्याकडे.
शाळेच्या वाटेकडे.

किती सवय झाली तरी कधीं कधीं जेव्हां
वारे बाहेरच थांबतात, खिडक्या पाठ फिरवतात,
भिंतींतून वाफा निघूं लागतात, तेव्हां
त्यामधून वावरणारी मेंदीचीं पावलें निघूं निघूं करतात
कावरेबावरे डोळे लागून राहतात त्या तारणहार
डोळ्यांकडे. दूरवर पोचलेल्या समुद्राकडे.

आणि सवयीमुळेंच की काय, आतां,
उघड्या दारांतून निर्भर वारा खेळत असला
फुलें हसत असलीं तरी समंजस पावलें
नेहमींच भिऊं भिऊं पडतात.

*निरोप*

हें लहानसेंच घर.
आंब्याफणसांच्या सावलीचें. समोर
झुलणाऱ्या बांबूंचें. आल्या-गेल्याचें. पाहुण्यांचें.
मुलाबाळांचें. लाडक्या मुक्या प्राण्यांचें
आमचें दोघांचें.

कित्येक सुखाच्या लहरी याच्या भितींनीं
ध्वनिमुद्रित करून ठेवल्या असतील.
कित्येक दुडदुडणारीं पावलें याच्या जमिनीनें
वत्सलांच्छनासारखीं जपून ठेवलीं असतील.
कित्येक कोसळणाऱ्या क्षणांना याच्या
कौलारानें आधार दिला असेल.

भाजून काढणाऱ्या उन्हाच्या झळांतून
यानें मला दिलासा दिला आहे.
घोंघावत येणाऱ्या वादळांतून यानेंच मला
सावरलें आहे. खिडक्यांच्या गजांनीं
माझे अश्रू पुसले आहेत.

याला... सोडून निघताना माझें काळीज
वितळेल. आणि हें–
खिडक्या दारें मिटून भरल्या मनानें आशीर्वाद देत
मागेंच उभें राहील. आईसारखें.

## *जेव्हां भिंती स्तब्ध होतात*

जेव्हां भिंतीं स्तब्ध होतात. खिडक्या आकसून राहतात
आणि उघडीं दारें झाकोळून येतात, तेव्हां
त्यांमधून वावरणारीं अल्लड पावलें पळूं पळूं करतात.
कावरेबावरे डोळे लागून राहतात घड्याळाच्या काट्याकडे.
शाळेच्या वाटेकडे.

किती सवय झाली तरी कधीं कधीं जेव्हां
वारे बाहेरच थांबतात, खिडक्या पाठ फिरवतात,
भिंतींतून वाफा निघूं लागतात, तेव्हां
त्यामधून वावरणारी मेंदीचीं पावलें निघूं निघूं करतात
कावरेबावरे डोळे लागून राहतात त्या तारणहार
डोळ्यांकडे. दूरवर पोचलेल्या समुद्राकडे.

आणि सवयीमुळेंच की काय, आतां,
उघड्या दारांतून निर्भर वारा खेळत असला
फुलें हसत असलीं तरी समंजस पावलें
नेहमींच भिऊं भिऊं पडतात.

## *भिन्न सावट दाटले*

भिन्न सावट दाटलें,   कसें भरारा पांगलें
झोत उन्हाचे धारोष्ण,   चारी दिशांनीं झरले.
कुठें कारंजें अनाम,   तेजधारांनीं उसळें.

शिवकांचीचा समुद्र,   शेला उन्हाचा सावरी
भिववीत लाजवीत,   करूं पाहतो मस्करी
तटावर उभी माझी,   साडी भिजवी चंदेरी.

उन्हापाण्याच्या वेलीला,   आला विजेरी बहर
नभ ढाळतें वरून,   जाईजुईचा संभार.
मनोमनींच्या क्षणाला,   चढे उन्हाचा मोहर.

उन्हाच्या या उत्सवांत,   कशी सावरून राहूं?
वज्रमणी हा मनींचा,   कसा सांभाळून ठेवूं?

## चाफळ

दरी डोंगरावरून, उन्हें नाजूक झरलीं
निळया-हिरव्यावरून, खेळे उन्हाची मासोळी
उंच उंच डोंगरांचें, निळें शेलारी कोंडाळें
जांभुळक्या लहरींचे, सभोवार ऊंसमळे

मागें कळस सोन्याचा, टाकी किरण सोनेरी
झुळझुळे खालीं माण, साडी नेसून भर्जरी
देवचाफ्याचें तोरण, तसा पूल की तोलाचा
कठड्याशीं डोळाभर, खेळ चालतो उन्हाचा

उन्हें ओलांडून मन, काळोखाच्या गुहेपाशीं
कमंडलूच्या पाण्याची, आली झुळूक गारशी
चिकटलें काळोखाला, मन भिऊन व्याकूळ
नादगंभीर खडावा, दूर टापांची चाहूल.

## *किनारा*

इथून तो किनारा दिसत नाहीं. पण
तिथें तो नक्कीच असणार आहे.

साखरेसारखें शुभ्र वाळवंट
ज्यांत छोटीशी विहीर खणायची
चिमणींचा खोपाही रचायचा

लागूनच लुसलुशीत कुरण
ज्याच्यावर पिवळया चोचीच्या चार मैना
टिपत टिपत फिरायच्या

किलवरी दळाच्या हिरव्या अंबोशीवर
चिमुकल्या भेंडचा लगडलेल्या असायच्या
आंबट, चविष्ट बाजार मांडायचा.

माझ्या भातुकलीसाठीं पुरेसें आहे.

## ठाऊक नाहीं।

किती दिवसांत दिसला नाहीत.
कुठें गेला होतात की काय ?   एक परिचय.

कित्येक दिवसांत भेटली नाहीस.
विसरून गेलीस की काय ?   एक स्नेह.

कुठें गेलें होतें, ठाऊक नाहीं.
विसरून गेलें की काय, तेंही ठाऊक नाहीं.
मीच
मला कित्येक दिवसांत भेटलें नाहीं.
दिसलेंही नाहीं.

## मनमग्न

जीवाला वेढून राहिलेलें हें
अथांग एकाकीपण...

विजनांत उमळून येणारें
जनसंमर्दांत गोठून घेणारें
प्रचंड भोवऱ्यासारखें गरगरणारें हें
अजस्त्र धाराचक्र...
आंत आंत ओढणारें.

आणि मी, मध्यबिंदूसारखी तटस्थ.
मनमग्न.
मोरपिसावरच्या डोळ्यासारखी.

## सदा कृतज्ञ

पावसाच्या पहिल्या फवाऱ्यासरशी
भुसभुशीत जमिनींत उगवून आलेलें
तें रसरशीत गवत...

वरून झेपावणाऱ्या त्या अफाट अवकाशाखालीं
झुळझुळणारें तें चिमुकलें शेलारी कारंजें
सदा प्रसन्न आणि कृतज्ञ...

निळ्याभोर आकाशाशीं. उन्हावाऱ्याशीं
पाऊसपाण्याशीं. दंवाधुक्याशीं.
मालवलेली पानें आणि गोजिरें बीं
जपून धरणाऱ्या त्या धरित्रीशीं
सदा कृतज्ञ.

## शोध

कमळवेलींच्या नाजूक गुंतावळ्यांतून
अलगद सोडवून घेताना, तावून सुलाखून निघालेलीं
हीं पावलें, अगदीं जुळवून ठेवलीं आहेत
विटेवर ठेवल्यासारखीं.

आभाळाभर फिरणारें प्रचंड शक्तिशाली मन
ओंजळींत अगदीं घट्ट मिटून धरलें आहे.
एका ठिणगीसारखें.

कानाडोळ्यांच्या आणि सगळ्याच जाणिवांवरून
एका संज्ञाबंद चिलखत चढवून राहिलें आहें.
अभंग आभाळासारखें

एक इशारा .. आणि शोध. कोण्या नव्या ग्रहाचा.
पण त्या तयारीनेंच त्या नव्याच्या
किती जवळ जाऊन पोचलें आहे–

## सप्तपदी

त्याच्या डोळ्यांतील हसण्यांत ती गुंतली.
त्याच्या रम्य बौद्धिकांत रमली. त्याच्या सुरक्षित
सहवासांत सुखावली.
त्याचे व्यापताप, त्याचें सुखदुःख तिनें
आपलें मानलें.
तिनें प्रेम केलें.
त्याच्या पावलांना ती अनुसरली...

तोही तिच्या विभ्रमांत गुंतला. बोलण्यांत रमला.
वेलीसारख्या तिच्या सहवासांत
त्याचा सन्मान सुखावला. तिचें सुखदुःख...
पण आतां त्या वेगळेपणाची गरजच काय ?
तिचा हात त्यानें मोठ्या आत्मविश्वासानें
हातांत घेतला.

तिची आंतरिक इच्छा. आवडनिवड. आशाआकांक्षा.
हें सगळें...

## *पाटी*

एक आठवण. पाटीची.
कोळशानें घासून पुसून लख्ख करायची. मग
तिचा शीतल स्पर्श गालाला लावून पहायची.
दुधी पेन्सिलीनें तिच्यावर लिहायची...

थोडीशी उजळणी. थोडेसें शुद्धलेखन. थोडीशी
बेरीज, भागाकार.
उरल्या जागेंत पाच ठिपक्यांचें वृंदावन
नाहीं तर सात ठिपक्यांची कुयरी
नसेलच जागा तर... चंद्र, सूर्य, कुंडी, फुलझाड
सर्वांत खालीं पूर्ण नाव. पाटीच्या खालच्या
चौकटींत अर्धें उभें असलेलें

आजही हातांत पाटी आहे.
तिच्यावर दोन्ही बाजूंनीं रेखतें आहें
फक्त माझी सही
वळणावळणाची. लपेटदार, थोडी नाटकी
थोडी आत्मकेंद्रित, थोडी दुर्बोधही.

किती गिजमिट झालें आहे, पण
या पाटीला कोळसा कुठें आहे ?

*धिंगाणा*

उघडचा खिडक्या दारांतून येतात
दंगा घालणारे आडदांड वारे
धसमुसळे पावसाचे झोत
पिंगा घालणारे धुक्याचे लोट
लाघवी खेळकर उन्हें...

अंधारतें शहर, दिवेलागणीनें
लखलख उजळत जावें तशी मनभर
उत्सवाची कारंजीं उसळत जातात
डोळचांतून स्वागताच्या आरत्या
फिरायला लागतात...
पापण्या मिटलेल्याच राहतात...

सहज पांघरुणाबाहेर पडलेला क्षीण
रुग्ण हात, त्या धिंगाण्याच्या स्वाधीन करून
मी निपचित पडून राहतें. त्या वेळेपुरती मी
किती तृप्त असते... मुक्त असतें !

## सहज कुठें....

सहज कुठें ओळख झाली. संगतींत सुखावली.
लोभावलीही.
हें सगळें कसें सहज सुंदर इंद्रधनुष्यासारखें

पण केवढा बोभाटा
केवढी चीरफाड
केवढी मोडतोड

पाकळीवरील दंवाला चूड लावण्यासारखं
लहरत्या पिसोळीवर गोळी झाडण्यासारखें

त्या उद्ध्वस्तापलीकडे दिसणारे
ते आर्जवी डोळे...

तिला जाईचें मार्दव देणारे
तुफानाचें बळ देणारे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. २७५६ २३५६५
काव्य २५०.२२
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

वजाबाकी

ही मी इथें. ती मी कुठें राहिलें ?
वाटचालींत, राहिलें गेलें याचे हिशेब
कुणी केले ?

घनदाट डोंगर तांबडी उतरण
घसरणीवर कांकण पिचलें
वाटेवरती कांचा पेरीत सहज सहज चालत राहिलें.

फांद्यांचे व्यूह. काटेरी रान
ओचा-पदर अडकून राहिले
जरीधागे रेशीम फाडून तशीच सुसाट पुढें गेलें.

अनाम पक्षी, अनोखी शीळ
दगडागोटच्यांत बोट फुटलें
भळभळ शेला पसरून त्यावर तशीच पावलें टाकीत गेलें.

अशा तशा वाटचालींत
काय गेलें, काय राहिलें ?
आपल्यासाठी वजाबाकी. समजल्यावर काय उरलें ?

## निरोप घेऊन....

निरोप घेऊन पुढें जाणाऱ्यानें मागें
वळून पाहूं नये... त्यांत अर्थ नसतो.

पुढें जाणाऱ्याच्यासमोर सुरम्य
क्षितिजें उलगडत जातात.
मागें राहणारा उभाच असतो. खोलवर
मुळें रोवून वृक्षासारखा.

मागें वळलेल्या नजरेनें
तो उभा गदगदेल, भूकंपाचा हादरा
बसल्यासारखा. उन्मळून पडेल तर त्याची
कोवळी पालवी, जाणाऱ्याच्या पावलांना आडवी
येईल
पण तसें होत नसतें.

म्हणूनच निरोप घेऊन पुढें जाणाऱ्यानें
मागें वळून पाहूं नये... त्यांत अर्थ नसतो.

## रानवाटा

काजव्यांचे चाळ पायांत घालून
दुडूदुडू धावणारी. फुलपाखरासारखी

विजेचा कमरपट्टा घालून
सैरावैरा धावणारी. रानवाऱ्यासारखी.

कपाळावर चंद्रबिंदी रेखून
ठुमकत पावलें टाकणारी. मोरासारखी.

केव्हांपासून पाहत आहे
या रानवाटा कुठें निघाल्या आहेत ?
की,
माझी नजरच अशीतशी धावते आहे ?

## *केवढी ताकद हवी ?*

केवढी ताकत हवी, पाऊल पुढें उचलून
टाकण्यासाठीं... सामोरें जाण्यासाठीं !

केवढी शक्ति हवी, उफाळून आलेलें
काळजांत कोंडण्यासाठीं... ओठ हसरे ठेवण्यासाठीं !

केवढा आवेग हवा फुलेरी फांदी
वाऱ्यावर झुलण्यासाठीं... मोकळेंढाकळें वागण्यासाठीं !

पण जीवन किती समजूतदार असतें !
वाऱ्याची झुळूक आल्यागेल्यासारखें सगळें
सहज सहज होतें.

मन मात्र गारव्यानें भरून जातें.

## *जेव्हां भ्यायचें*

जेव्हां भ्यायचें तेव्हां धीट होतें
जेव्हां धिटाई दाखवायची तेव्हां
गांगरतें.

जेव्हां वृक्षासारखें तोलून रहायचें
तेव्हां पाचोळा होतें.
जेव्हां डहाळी होऊन झुलायचें तेव्हां
खोड होऊन जातें.

नको तेव्हां नको तेच करतें.

इतक्या अंतरावरून स्वच्छ प्रकाशांत
आतां ती चित्रशाळा निरखून बघताना
ओठांवर हसू उलगतें. तेंही
मोनालिसासारखें.

*आलोक*

अनंत काळोखांतील वाटचाल ..
थकणारी. जड होणारी. छातींत कोंडून येणारी

असेंच ओढत चालताना पावलें एकदम
उत्फुल्ल होतात.
कसल्या अमृतलाटा पायांवर येतात
अवघ्याचें एक निशिगंधाचें फूल होतें.

भोवतालच्या काळोखांत आतां त्याची
चांदणी वलयें दरवळतील
शीतल गाभारा भरून टाकतील.

## एक खेळ

जन्मायचें. मरायचें.
यायचें. जायचें.
असायचें. नसायचें.
हा एक खेळ...

आईच्या पदराआड दडायचें
दाराआड लपायचें
पुढें झुकून 'कूक्' करायचें
पुन्हां 'दडायचें'
पुन्हां 'कूक्' करायचें

भयानें झाकळायचें
विस्मयानें उजळायचें
कौतुकानें भरायचें

असा हा एक खेळ.
डोळे भरून पहायचा
डोळे मिटून अनुभवायचा.

## *वळचणीच्या पाखरानें*

वळचणीच्या पाखरानें
    शीळ घातली जीवांतून
पापणीशी टेकलेलें
    माझें उडून गेलें स्वप्न...

दंवाधुक्याच्या पहाटेला
    कुठें शोधावा माझा रावा ?
गुंजडोळ्यांच्या पाखुटानें
    कसा साधला माझा दावा !

## *नांदत्या घरीं*

नांदत्या घरीं निघून जाणाऱ्या
लाडक्या माहेरवाशिणीसारख्या
एक-एक करत गोष्टी हातांतून
निसटत गेल्या.
आपल्या आपल्या शब्दांच्या
बांधाबांधीसकट...

आतां हें घर केवढें मोठें. अवकाशासारखें
उरलेले शब्द तरीं किती थोडे... फक्त
माझ्यापुरतेच.

## झोप

मच्छरदाणी, पांघरूण नीट जमवून घ्यायचें
आणि उशागतीच्या मंद प्रकाशांत
पानामागून पानें उलटत निघून जायचें एका
वेगळ्या जगांत...

सवयीप्रमाणें मग केव्हांतरी परत येऊन
घोटाघोटानें सावकाश चव घेत रहायचें
कडक काळ्या कॉफीची. जितकी कडू तितकीच
गोड, अशा पेलाभर झोपेची.

प्रत्येक घोटाची वेगळी चव :
गाढ समाधानाची. असह्य व्यथावेदनांची.
स्वप्नांच्या नजराण्याची.
भवितव्याच्या कठीण तराण्याची
आणि कधीं, ढगाळ आभाळांतून झरझर
धावणाऱ्या धूसर चंद्राची.

## एक अडगळ

ह्यांच्या,
खाण्यापिण्यांतील आवडी, पाहुण्यांची जेवणें
हें सर्व तत्परतेनें माहीत असतें एकनाथला
अगदीं तपशीलासकट.

ह्यांचे, कपडे - भट्टीचे, ऑफिसचे, प्रवासाचे
हें सर्व काळजीपूर्वक पहात असतो शंकरमामा,

ह्यांच्या जाण्यायेण्याच्या सर्व वेळा, ऑफिसच्या
क्लबच्या, विमानतळावरच्या, अचून
माहीत असतात कालीदास शोफरला

घरांतील खरेदी, पैशाचे व्यवहार, नोकरचाकर
या सर्वांवर करडी नजर सास्रीकरांची

घरच्या बाहेरच्या पार्टींतून हे
ग्लास हातात धरून फिरत, रंगदार घोळक्यांतून
मी नसल्यासारखीच.
एका बाजूला उभी ओठांवर स्मित ठेवून

परदेशांतील मुलांचीं पत्रें मधून मधून.
डॅडींचा रक्तदाब, त्यांचा प्रवास, त्यांचा व्याप
त्यांची काळजी. पत्रभर तेच उत्सवमूर्ति.

आणि अगदीं शेवटच्या ओळींत मम्मीचीं
अडगळ नमस्कारापुरती.

मला ही चैन हें ऐश्वर्य हवें होतें. पण
हें असें उकिरड्यासारखें वाढून
मलाच चिणून टाकील, असें
कधीं वाटलें नव्हतें.

*अबोला*

हा अबोला. कट्टीचा. गट्टीफूचा.
हंसूरुसूच्या गमतीचा, बरोबरीच्या गडणींचा.

हा अबोला. आग्रहाचा. नाजूक मागणीचा
गोऱ्यामोऱ्या ताणाचा. होय-नाहींचा.

हा अबोला. कौतुकाचा. फुगऱ्या गालांचा
कोवळ्या रागाचा, बोलणार नाहींच्या ठसक्याचा.

हे अबोले. जाईजुईचे सुकुमार झेले.
गंधगारव्याचे अलवार हिंदोळे.

हा अबोला. वडीलधाऱ्याचा. अढीतिढीचा
तापलेल्या चेहऱ्याचा. घुसमटण्याचा.

हा अबोला. घट्ट मिटल्या ओठांचा. उपेक्षेचा
जिव्हाळ्याच्या दुराव्याचा.

हा अबोला. पाठमोऱ्यांचा. धागे तुटून गेल्याचा
विजनांतील काळोखाचा.

हे अबोले. कुसळ-तणाचे झेले. लसलस सलतानाचे
आर्त असे गुंताळे.

हे अबोले अतां न उरले सुमकुसळांचे झेले
हर्षव्यथेचे गुथलेले सरः
उरले केवळ अथांग सागरलहरीवरले
सुशुभ्र फेनिल तरल वळेसर.

## *त्या वेगळ्या जगांत*

त्या वेगळ्या जगांतील आभाळांत
बारीक चांदण्यांचे प्रवाह. वाळूच्या नदीसारखे
आणि कोसळणारे धबधबे,
माझ्या पायांखालील वाळू सरकणारी...

त्यांतील प्रवास. आगगाडीचा. फलाटावरील
दमछाकीचा. गाडी चुकण्याचा. चुकीच्या गाडींत
बसण्याचा. केव्हां घनदाट उत्तररात्रीं पहाडांच्या
विजनांत युगानुयुगें स्तब्ध उभ्या गाडीचा,
भीतीच्या काहुराचा.

त्यांतील रस्ते, कधींतरी नजरेखालून गेलेले.
देवळाच्या वळणापाशीं चौरस्त्यावर नेमकी
नेहमींच चूकभूल करणारे, पायांत कापरें भरवणारे.

त्यांतील घरें जुन्या बांधणीचीं, रुंद भितींतील
उंच पायऱ्यांच्या अंधाऱ्या जिन्यांचीं. पंक्तीसाठीं
लांबरुंद पडव्यांचीं. मोठ्या मोठ्या दालनांचीं.
गूढगर्भ.

त्या घरांतील माणसें. कधीं कुठें न पाहिलेलीं
सारखीं वावरत राहणारीं. फक्त आई तेवढी कधीं
जवळ असणारी. बोलणारी.

भेटावा असें मनोमनीं वाटत असलेला तो
अगदीं क्वचित घरांतच. पाहुणा. कशाकशांत
गुंतलेला. अनोळखी चेहऱ्यांनीं वेढलेला. आणि
इकडे-माझा जीव तुटत असलेला.

तुटलेल्या ताऱ्यासारखें त्या जगांतून
एकाएकीं निखळायचें. सुरक्षित जगांत
डोळे उघडायचे.
ती हुरहूर, ती भीति, तें काहूर
मनांत सतत आभाळ धरून रहायचें.

*शीळ*

जास्वंदीच्या परागाची, कांडी नाजूक सरळ
अशा शीळेनें उमले, माझी सुरेख सकाळ
चांदण्याच्या रांगोळीनें, कोन त्रिकोन रेखावे
तसे मंजूळ शिळेनें, संथ लयींत घुमावें
ओघळावा मणिसर, मण्यामागून मण्यांनीं
तशी द्रुत लयींतून, शीळ घळावी थेंबांनीं
कधीं हळूच ताणावी, फूलपाकळी कोमळ
तशी अस्फुटशी शीळ, तार बीनेची विव्हळ

शीळ ऐकतां ऐकतां, शीळ काळजा लागली
आली काय शेजाराला, भरल्या दिसांची पाखुली ?

## कासावीस

अचानक सैरावैरा धावणारे प्रचंड वारे
संतप्त हत्तींच्या उधळलेल्या कळपासारखे
निबंध सुटलेले मेघखंड
राजरस्त्यावर झगमगाट पसरणारीं
धडाधड बंद होणारीं दुकानें
त्या अभद्र अंधारांतून पळणारे
चपलांचे बुटांचे वाहनांचे भयभीत आवाज
डोळ्यांत झोंबणारा धूर
लाठ्यांना फुटलेल्या किंकाळ्या
या सर्वांत मिसळलेला रडव्या संतापलेल्या
भ्यालेल्या आवाजाचा कल्लोळ

हें काय, हें समजण्यापूर्वीं
माझ्या मुठींतील चिमुकलें बोट त्या
थैमानांत सुटून गेलें
विजेच्या लोळाची वाट पहात रस्त्याच्या
मधोमध मी कासावीस उभी राहिलें.

*मोहरून आला आंबा*

मोहरून आला आंबा
    गंध कोंदला गारव्यांत
पहाटेच्या वारियाची
    जडभारी झाली लाट

येतां अंगावर लाट
    घ्यावा श्वास खोल खोल
गंधसाजिरी व्हावी काया
    व्हावी दंवाची मणिमाळ

असें सजून मोहरून
    गुंग होऊन थबकावें
मावळत्या चांदणीनें
    थोडें कलून उतरावें.

## *जेव्हां जेव्हां ....*

जेव्हां जेव्हां
कांहीं बघावें म्हणून बाहुल्या, पापणीच्या दाराशीं येतात
बोलावें म्हणून शब्दुल्या ओठाशीं धावतात
ऐकावें म्हणून श्रुति पाळीशीं ओठंगून राहतात
समजून द्यावें-घ्यावें म्हणून संवेदना
हाताशीं, बोटाशीं पोचूं पाहतात...

तेव्हां तेव्हां
त्या अलवार लहरी उन्मळून येऊन पोहचण्यापूर्वींच
कशाला कशाला होऊन मागें सरतात.
विरत पसरत, सरकत मागें पोचतात.
अगदीं मागें... पार पलीकडे.
गाभाऱ्याच्या उंबऱ्याशीं भगवान बुध्दाच्या
त्या स्मितापाशीं.

## *आला वसंत*

आला वसंत वसंत आला
तनामनाचा झाला हिंदोळा

उन्हमोगरा आला बहरा
ओल्या वाळ्यांत शीतळ वारा
मेंदी अळिता हातापायाला
चंदन-हीना गोऱ्या अंगाला
साडी शेलारी, मोर काठाला
मोतिया सर शिरीं माळला

हिरवे सारे रंग दुलारे
कोकीळ गाणें निळ्यांत भरे
रंगा नव्हाळी गंधा जिव्हाळी
कोऱ्या फांदीला धुंद कोवळी
कोमट वारा वाहे भरारा
सळसळ शिपण वर्षल्या गारा

आला वसंत वसंत आला
तनामनाचा झाला हिंदोळा

## *किती राहून गेलेलें*

किती वाटा
चुकल्यामुळें चुकलेल्या, चुकवल्यानें न भेटलेल्या
राहूनच गेलेल्या.

किती योगायोग
हुकलेले. न आलेले येऊनही न उमजलेले
धुक्यांत हरवलेले.

किती राहून गेलेलें
ठरवलेलें. न ठरवलेलें. कल्पनेंतही
न आलेलें... अदृष्टांत लपलेलें.

किती चुकामूक...
हें सगळें एक वेगळें जग
आपलेंच, पण आपल्याशिवायचें
काळजाशीं गुंतून राहिलेलें
पण तसें केव्हांच, आभाळाशीं पोचलेलें.

*गुलमोहेर*

पालवली फांदी फांदी
    हिरव्या नाजूक झुबक्यांनीं
काय माहेराची वाट
    गौराईच्या पावलांनीं ?

बहरली फांदी-फांदी
    लाल-केशरी झुबक्यांनीं
काय माहेरवाशिणीच्या
    घर भरलें हसण्यांनीं ?

अंगणांत गुलमोहोर
    पालवतो, बहरतो
मायलेकीच्या जिव्हाळ्याला
    शुभशकुन साक्षी होतो.

## कागदावर

कागदावर
एक मोठा लांबट असा उभा चौकोन
हें घर.
त्या चौकोनाच्या वरच्या आडव्या रेषेवर
दोन समान तिरप्या रेषांनीं एक
ठेंगणासा त्रिकोन. हें घराचें छप्पर.
त्या चौकोनाच्या खालच्या आडव्या रेषेवर
दोन्ही बाजूंना बरीच सारखी जागा सोडून
मधील रेषेखालीं तेवढ्याच समांतर अशा तीन चार
रेषा. या घराच्या पायऱ्या.
त्या चौकोनाच्या त्या मधल्या रेषेवर एक लहानसा
लांबट असा उभा चौकोन
हें घराचें दार.

दारांत एकदम एक भावली.
गोऱ्यापान अंगाची.
विंचरलेल्या काळ्या चकचकीत केसांची.
कपाळावर चंद्रकोरीची. नाकभर नथीची
कानांत चंद्रबाळ्यांची.
गळाभर दागिन्यांची.
हातभर बांगड्यांची.
पिवळ्या तांबड्या साडीचोळीचीं
खोचलेल्या पदराची.

तिचे काळेभोर मोठे मोठे डोळे
जरा बाजूच्या उंच नारळीपलीकडे
तीन डोंगरांच्या मागें, पलीकडे .. आभाळावर
पाच-सात पक्ष्यांवर.

त्यांच्यामागून, रेषा नि रंग, पंख पालवीत
निघून गेलेले
कागदाबाहेर इथें
मी स्तब्ध.
सगळें कांहीं हरवून.
डोळ्यांत एक थेंब घेऊन.

## पाऊस कोसळतो

पाऊस कोसळतो
कोसळतो एकतान
जड झाल्या धारा
जडभारी झालें मन

पाऊस कोसळतो
इथें उभी वळचणीशी
उडत्या तुषारांचें
पाणी दाटलें पापणीशी

पाऊस कोसळतो
पागोळीला धरवेना
भिजून झालें चिंब
भान वेगळें जाणवेना

पाऊस कोसळतो
आवरेना धरणीला
रान-शिवार सैरभैर
पाणी लागलें कमरेला.

पाऊस कोसळतो
कोसळतो शिळंधार
मल्हार माळला मी
दूर टाकलें घरदार.

*गुंतलें ...*

गुंतलें-जिव्हाळ्यांत. संसारांत. निसर्गांत...
गुंतत गेलें :
त्याच्या आठवणी. पुन्हां
आठवणींच्या साठवणी पुन्हां आठवणी
त्यांची भरलेलीं रेशीमचित्रें
त्यांचीं रेखलेलीं विचित्रें...
गुंततच गेलें...
असे तसे उभे आडवे धागे तसूतसूंनीं
गुंतत राहिले.

एवढ्याशा निर्भर आयुष्याचा
केवढा हा जंजाळगुंता, न सुटण्यासारखा.
सुगरणीच्या घरट्यासारखा.
मात्र पिल्लें-पक्षी उडून गेलेले, बापुडवाणे.
असे तसे झोके खाताना फांदीला
घट्ट चिपकून राहिलेलें.

अनोळखी शहराच्या राजमार्गावर तें
भव्य देवालय, क्षणभर कळसापर्यंत पाहिलें
पाताळीचे संस्कार उमळून आले... वाटलें
आंत जावें. दर्शन घ्यावें. त्या करुणाघनाच्या
पायांवर मस्तक ठेवताना
मनाचा एक ठोका थांबतो का पहावें. त्यांत
त्या गाभाऱ्यांतील सुगंधशीतळ तेज तीर्थासारखें
भरून घ्यावें...
असें मन भरून चालताना मधेंच पाय
अडखळले. तिथेंच थांबलें.

समोर आवारांत
मोठ्या चौथऱ्यावर कमानदार मंडपीखालीं
एक बाळ गजराज उभा होता.

भक्कम साखळदंडांनीं मागचे दोन्ही पाय
घट्ट ताणून ठेवलेले
पुढच्या पायांशी, पायांतील आणि गळ्यांतील
साखळदंड वेटोळ्यानें खळ्‌ळं खळ्‌ळ करणारे
मालवलेल्या डोळ्यांतून असहाय एकाकीपणाच्या
पायवाटांचे ओलें-सुके ओघळ झिरपणारे

तो पुढचीं पावलें उचलून अशी तशी मान झुकवून
झुलत होता, अगदीं प्राणपणानें झुलत होता.
समोर टाकलेल्या पसाभर गवतांतील मूठभर गवत
कोकळ्या सोंडेनें उचलून गंडस्थळावर सारखें पसरत होता.

प्राणपणानें उचलत होता,
पसरत होता.

बाळ गजराज झुलत होता.
मीं त्याला डोळाभर पाहिलें–दोन
सुकलेले अश्रू त्याच्या पुढ्यांतील गवतावर
वाहिले. डोळाभर काळोख मनांत भरून
तिथूनच परत फिरलें.

## देवस्थान

जागृत देवस्थान, पर्वणीचा दिवस.
प्रवेश द्वारांतून न चालतांच आंत गेलें.
पादत्राणसुरक्षाकडे चपला ठेवून मुक्त झालें
पूजा सांभाळीत पुढें चाललें.

मामी घडयाळ सांभाळा.
काकू पर्स सांभाळा. चेन सांभाळा.
फिरणाऱ्या पोलिसांचे फिरते घोष ऐकले
सगळें छातीशी घट्ट धरलें पुरती बद्ध होऊन
भयाच्या गळाभर पाण्यांतून पुढें
सरकत चाललें.

गाभाऱ्यासमोर लांबलचक कट्टा. त्यावर
चौके खोललेले बँकेंतल्यासारखे. पोस्टातल्यासारखे.
इथें फुलें दुर्वा. इथें तांदूळ प्रसाद. इथें पैसे.
इथें कापूर उदबत्ती. इथें... इथें...

चौक्याचौक्यांतून हजेरी नोंदताना मधेंच
डोळे दिपले.
विद्युद्दीपांची रोषणाई. चांदीसोन्याचा झगमगाट.
हिऱ्यामाणकांचा लखलखाट...
दिपलेले डोळे किलकिले झाले तेव्हां मी
बाहेर आलें होतें...

दर्शन घडलें होतें की नव्हतें ?
हात जोडले होते की नव्हते ?
मनांत कांहींच नव्हतें
मुकेंमुकेच चालूं लागावें वाटत होतें.

## *सांगावा*

एकदां तरी येऊन जा.
एकदां तरी घेऊन जा.
मनाची कळ सोसत आवरत सांगावे केले
आभाळांत. पाताळांत. डोंगरमाळांत
वाऱ्याच्या पंखावरून
उन्हाच्या कागदांतून
पावसाच्या तारांमधून
धुक्याच्या पायांत बांधून
भराभरा सांगावे धाडले.

काळ्याशार तळ्यांतील झिरीमिरी आभाळावर
डोळे लावून राहिले.

## *दिनरातीच्या*

दिनरातीच्या निष्पर्ण फांद्यांवरून
लवलव पालवी कशी भरभर ठिपके देत चालली आहे.
क्षणांच्या रंगीबेरंगी पिसोळ्यांचें एक-एक झुंबर
कसें उडत-बागडत दिसेनासें होत आहे.
काळ किती मुलायम वेगानें जातो आहे...

कालची तिथी, आजचा वार, उद्यांची तारीख
कांहीं लक्षांत येत नाहीं.
गेल्या रविवारनंतर लगेच हा रविवार उंबऱ्यांत
कसा उभा राहिला, भान रहात नाहीं.

काळाचा कसा सरकता जिना झाला आहे
त्याच्या मखमली पायरीवर
अलगद उभें राहून, मीं कशी मजेशीरपणें
निघालें आहें. एक गंमतच.

## सय

वाऱ्यावरून की यावी
    आर्त चांदण्याची शीळ
भारणाऱ्या गाण्यांतील
    यावी काळजाची ओळ

संपलेल्या आयुष्याची
    अशी एक सय व्हावी
तापलेल्या जिवाभावा
    धून नादवून जावी.

*नाहीं माझ्या चुलीपाशीं*

नाहीं माझ्या चुलीपाशीं, ताका-मेढीचें अप्रूप
कशी ठेवीन बांधून, त्याचें अवखळ रूप ?

नाहीं माझ्या अंगणांत, जोडी अर्जुनवृक्षाची
कशी आडवीन त्याची, रीत खट्याळपणाची ?

लहानशा झोपडीला, नाहीं कवाड-कडीही
कशी ठेवीन कोंडून, त्याची अनघड धिटाई ?

मी न राधा, ना यशोदा, नाहीं गोकुळींची कोण
मथुरेची ही मी कुब्जा, नित्य घाशितें चंदन

चंदनाचे वेढे घेतां, फक्त गोळी सहाणेशी
गंध जातो, कुठें जातो, ज्याच्यासाठीं त्याच्यापाशीं

कुणी कुणाला बांधणें, कुणी कुणाला कोंडणें
माझें चंदनाचें बन, त्याचें वारियाचें येणें.

## कडेलोटावर

एका क्षणाच्या कडेलोटावर. समोर
दूरवर. खोल खालीं वाकत चाललेलें आकाश.
पुढचांत पायाशीं, खालून
वर येत राहिलेला घनदाट धुक्याचा उफाळा
बाजूला... केवळ अवकाश
आणि मागें–
मागून डाव्या खांद्यावर तुझ्या हाताचा स्पर्श
आभास आहेस की खरा तूंच आहेस ?
सोबती आहेस की साथी आहेस ?
क्षणोक्षणीं केवढें मोठें भय
आणि केवढा निश्चित विश्वास !

## सुजाण

असणार-नसणारच्या
गूढ धूसर वाळूचा हा एक चिमुकला ढीग
उरलेल्या आयुष्याचा.
कणांक्षणांची त्याची लागलेली शीग दीपमाळेसारखी
ज्यांतील एक-एक क्षण, सुरेल अवरोह घेत
खर्जांतील 'सा'च्या महासागरांत विलीन होत
असलेला. एक दूधसागर. आत्ममग्न.

पूर्वसुकृताचे छायाप्रकाश अंगावर लहरत असलेला
त्या ढिगाचा चढउतार श्रावणांतील
निळ्या-जांभळ्या डोंगरासारखा अलिप्त.

तो चिमुकला वाळूचा ढीग. आणि त्याच्यासमोर
त्याचें झिळमिळणारें प्रतिबिंब, एकटक डोळ्यांत धरून
फतकल मारून बसलेलें मन.
-मनाचें अजाण बाळरूप.
त्याचे दोन्ही हात मांडीवर सैलसर
विसावलेले.
परमहंसासारखे. किती सुजाण !
सुजाणाहूनही सुजाण !

## धुमारे

उभ्या-आडव्या धावणाऱ्या वाऱ्याच्या
धारेनें, ते हिरवेपिवळे धुमारे खुडून टाकले.
तिचे गडद भरलेले डोळे अधिकच ओथंबून आले.
ओठ थरथरले. शिलकीची जपून ठेवलेली
भरजरी हिरवीं स्वप्नें तिनें ओरबाडून काढलीं.
रक्ताच्या थेंबासकट एका-एका जखमेवर
अलगत लपेटलीं.

गार-गार शेवाळाच्या गारव्याच्या जाणिवेनें
तिच्या डोळ्यांत कोवळीं उन्हें उतरलीं
हिरव्यागार पदराला झोले देत ती बघतच राहिली.
बघतां बघतां
त्या शेवाळांतून चमकचमक राघूंचा थवा
पंख पालवत आभाळांत गेला.
ती बघतच राहिली.

## निवारा

आलें माझिया माहेरा, तुझ्या कुशींत सागरा
जिथें असेन तेथून, एक तुझाच निवारा.

तुझ्या गाजेंत जिव्हाळा, तुझ्या लाटेंत उमाळा
तुझ्या वाऱ्याच्या मायेंत, जीव मोकळा मोकळा
तुझे फेसाळ उधाण, शिवाशिवीच्या खेळाला
तुझा किनारा मांडतो, बाळपणाचा सोहळा
जाईजुईचा वर्षाव, अंग भिजतें सुखानें
जसें रानींचें शिवार, दूधहलव्याच्या घासानें

नको घडवूं दागिना, लाल सूर्याची मोरणी
काठापदरा पोफळी, नको वादळी पैठणी
नको करूं पाठवणी, जरा इथेंच राहीन
आल्या वाटेचीं पाऊलें, गेलीं सहज धुऊन

आलें माझिया माहेरा, तुझ्या कुशींत सागरा
जिथें असेन तेथून, एक तुझाच निवारा.

## फांद्या झोकून रहावें

फळाफुलांचा बहर, रंग-गंध उधळतो
माझ्या काळजाला त्याचा, स्पर्श मुळींही न होतो
कुणी माया वाटली कीं, कुणासाठीं कुणासाठीं
नाहीं आतडयाची माया, शाप मात्र माझ्यासाठीं.

उतरत्या अंधारांत, उतरून येतो थवा
माझ्या अवतीं भोवतीं, किती मांडतो कालवा
हळू हळू एक एक, पानाआड शांत होतीं
पंख डोळुले मिटून, माझ्यापाशीं विसावतीं

भूपाळयांच्या गलाटयांत, फांद्यांवरून नाचती
जाती सूर्याच्या दिशेनें, परतून येण्यासाठीं
ऊनपाऊस झेलावे, वारावादळ सोसावें
गेलेल्यांच्या वाटेकडे, फांद्या झोकून रहावें

फळाफुलांचा बहर, रुखा-सुका येतो-जातो
माझ्या पंखुल्यांच्यासाठीं, जीव माझा ओढ घेतो.

## *मनावर*

मनावर...
दूरवर - धूसर क्षितिजावर
उमलत येणारी एक फेनिल लहर
की तरंगत येणारा बकुळीचा वळेसर ?

कधींकाळीं पळ, दोन पळ
तो दिसतो. एका साक्षात्कारासारखा.

-वण नाहीं. आठवण नाहीं. मुळीं झालेलीच नाहीं
की जन्मांतरींची ती ओली जखम
डोळयांत उतरते ?

आजवर...
पायांत जमवलेलें सगळें बळ कसें
ढासळून जातें.

## तें एकटेपण

तें एकटेपण. देवानें दिलेलें
सोनावळीच्या एकाकी फुलासारखें
आभाळाखालीं झुलणारें
कोवळ्या उन्हाचा शेला पांघरणारें
स्वप्नांची खेळणीं मांडून मग्न होणारें

तें एकटेपण. कुणीतरी सन्मानानें
काळजाच्या ओंजळींत ओतलेलें
अवकाशासारखें जिवाभोवतीं कोष करून राहिलेलें
झळंबलेलें. नकोसें तरी हवेहवेसें वाटलेलें
त्याचें म्हणून.

हें एकटेपण. माझें. मीच माझ्या वाटचालींत
जमवलेलें. मनभर. कधीं प्रसन्न मोकळें
दुपट्यावरील तान्ह्याच्या खेळण्यासारखें
कधीं रिकामें. असें रिकामें
वेड्या माणसाच्या हंसण्यासारखें.

## *केशराचा मळा (आप्पांचा)*

अथांग नीलिम्याखालीं
झळाळणारा केशराचा मळा. उन्हापावसांत
लाघवी हिमवर्षावांत सतत बहरणारा
केशराचा मळा. त्यांचा. त्या जादुगाराचा.

सदा सतेज गुलमोहराखालीं, केशरी किरणांच्या झोतांत
झोपाळ्याला मंद हेलकावे बसायचे
रेशमी धूम्रवलयांच्या महावस्त्रांत केशराचे गुच्छ
टपटप वेचले जायचे

त्या खोलींत- त्या देवघरांत
सकाळ संध्याकाळ त्यांचे प्रवेश असायचे
झुळझुळीत, सुगंधशुचिर्भूत. प्रसन्न.
कधीं खुर्चीवरून, कधीं आरामखुर्चीवरून, कधीं
खिडकींतून पहात, केशरकाड्यांची पखरण चालायची.
समोरच्याला तो अखंड अभिषेक
शुभ्र उन्हाच्या कागदावर
गोळा करताना पुरें व्हायचें.

केशरकाड्या दिगंत पसरायच्या.
अगणितांच्या अर्ध्यामुर्ध्या सुखाच्या पेल्याला
रंगगंधाची आनंदरुची चढवायच्या,
अगणितांच्या मनाच्या उजाड अंगणांत
शीतल शिंपण करायच्या...

तो केशराचा मळा आज उजाड आहे
ती खोली रिकामी आहे.
खुर्ची रिकामी आहे.

गुलमोहराची पालवी तीं धूम्रवलयें लपेटून
घेण्यासाठीं सवयीनें खालीं झुकत आहे.
तिच्या सावलींतील तो झोपाळा स्तब्ध आहे.

या साऱ्यांचें दुःख मुकें आहे. आभाळासारखें
आणि या साऱ्यांना कुशींत घेऊन समजावणारी ती
झोपाळ्याच्या कडीला धरून उभी आहे.
केशरी ज्वाळांनीं लपेटलेली ती, कोरड्या डोळ्यांनीं
दूरवरचें केशरमळ्याचें मृगजळ बघत
उभी आहे.

## दयाघन

एकटी चालताना
    ठेच लागली घणाघात
साथीला दयाघन
    शेला फाडिला क्षणार्धांत.

एकटी चालताना
    आलें वादळ रोंरावत
पानपाचोळा झाला जीव
    मुकी जखम काळजांत
साथीला दयाघन
    दु:खावरती ठेवी ओठ.

एकटी चालताना
    गेलें बुडत काळोखांत
साथीला दयाघन
    पुढें आधाराला हात
हातींच्या घड्याळाच्या
    विजा भिजल्या अमृतांत
जिवाभावाचा गजरा मी
    हातावरी त्या गुंथवीत.

## वसंत वैभव

गॅलरींतील, एकुलत्या कुंडीतील रोपावर
थोडी नवी पालवी फुटली
सुक्या पानांतील फुलांच्या पुडींत रंगगंधाची
मोहनें थोडीं टवटवूं लागलीं.
आढ्याशीं घरटें बांधणाऱ्या चिमण्यांची किलबील
कचऱ्यासकट थोडी वाढूं लागली.
माझ्या मनावरचा पक्षी निष्पर्ण फांदीवर बसून
क्षीण शीळ घालूं लागला
वसंत आला. खरेंच वसंत आला.

त्याच शिळेची लय पकडून, तेंच गुणगुणत
डबा नि पर्स घेऊन मी तराण्याच्या अंतऱ्यासारखी
जिन्यावरून रस्त्यावर आलें– गाडी गाठण्यासाठीं

रस्त्याच्या लहानमोठ्या फांद्यांवरचा तो
माणसांचा गजबज गजबज लगबग बहर
येणाऱ्यांचा, जाणाऱ्यांचा, रेंगाळणाऱ्यांचाही.

तो झेपावणारा दर्प – खानावळींचा मुताऱ्यांचा
काळ्या धुराचा, गर्दीचाही.
त्या कर्णकर्कश शिट्ट्या-रिक्षांच्या, मोटरींच्या, मालमोटरींच्या
आगगाडीच्याही.

माझ्या मनावरचा पक्षी घिरट्या घालीत
केकाटूं लागला –
वसंत कुठें गेला ? वसंत कुठें गेला ?

व्यापातापाच्या प्रचंड कठीण कवच बोगद्यांतून
मी दूरवर डोळे लावून राहतें
वसंताचे तुकडे कुठें जमलेत का पाहतें. पण
नंबर वाढलेल्या डोळ्यांना, दूरचें मागचें कांहीं
दिसतच नसतें.

*पिंपळ*

दारासमोर अंगणांत
 उभा पिंपळ तोल देतो
इथें माझ्या खिडकीशीं
 हिरवें मायाजाळ होतो.

उन्हें झुलतीं पानांतून
 फांदीमधून खेळे वारा
झिळमिळत्या पिंपळाची
 गाज गंभीर, चमकी ल्हारा

असें खिडकीशीं येता
 हिरवा सागर झेपावतो
माझे आनंदाचे पक्षी
 लाटांवरती खेळवितो.

वारा मिटतो पानांतून
 फांदीफांदींत काळोखतें
झाकोळत्या पिंपळाचें
 पंखमिटलें शिल्प होतें.

असें खिडकीशीं येतां
 मायाजाळांत गुंतवितो,
हात धरून चालवितो,
 दुजें माहेर भेटवितो.

## संध्यातीर्थ

वाऱ्याच्या एका दणक्यानें मी
दाराबाहेर ढकलेलें गेलें
बंद दाराच्या फटीफटींतून मी सारें तुफान सावरत
नजर लावूं लागलें.

घनदाट काळ्या ढगांच्या पडद्यांनीं तिला
चारी बाजूंनीं वेढलेलें.
इथून तिथून दिसलेली ती लगबग. हातांची देवघेव
सुयांची, बाटल्यांची, लाल रबरी नळ्यांची.
ती बिनआवाजाची पांढरी धावपळ. तो
प्राणवायूचा निर्विकार तटस्थ स्तूप.

मला ही आरास नको होती. मला फक्त तिथें
माझी पापणी पोचवायची होती
तिच्या कमळडोळ्यांतील प्रसन्न संध्यातीर्थांत
मला माझी पापणी शांत करून घ्यायची होती.

*पुन्हां बाळपण*

पुन्हांबाळपण यायचेंच
तर असलें बाळपण यायला हवें
बाळपणाचे मनांतील कोंभ
पुन्हां बहरून यायला हवे.

मागचें सगळें विसरायला हवें,
अवघड नातें सुटायला हवें
मोकळें मोकळें असायला हवें
आपलेतुपले आनंदाचे
मलयवारे व्हायला हवे

वाळवंटांत हरवायला हवें
गोधन आपुलें राखायला हवें
काल्यामध्यें रमायला हवें
खेळ थोडा. भान हवें
हंसत खेळत, संगत सोबत
मुरलीमागून निघायला हवें.

## प्रवास

छोटी बॅग घ्यायची, प्रवासाला निघायचें
पत्ता कोठें ठाऊक नसतो, रस्ता तोही माहीत नसतो.

चालतां चालतां वळण लागतें. वळणावरती जाग येते
दरडींवरील फूलपाखरू, समोर समोर भिरभिर करतें
बॅगेवरती क्षणभर टेकून, दरींत खालीं निघून जातें
मनावर रंग शिंपून जातें, पुढच्या पावलांत भिरभिर येते.

पुढचें वळण मनांत दाटतें, फांदीवर पाखरू शीळ घालतें
बॅग ठेवतें. पाऊल खिळतें, मन शिळेंत भिजून जातें.
चोचींत बॅग टिपून घेऊन, पहाडांत उडून जातें
बघतां बघतां, चालतां चालतां, पावलापावलांत गाणें येतें.

मोकळें मोकळें चालतानाच, पुढचें वळण व्याकूळ करतें
पहाडांतून सरकत सरकत, सावळा मेघ आडवा येतो
क्षणभर वेढून भान घेऊन, आला तसाच सरकून जातो
मनांत अमृत टाकून जातो, पावलांत झुळझुळ गारवा भरतो.

पुढचें वळण असतें. नसतें. नसतें असतें.
काळजाचें कारंजें नाचतेंच नाचतें.
पुढच्या पाऊलवाटेखाली
लाल गुलाब अंथरीत असतें.

## तरंग

उमळाव्या पाण्यावरी
    रेषा कशा एक एक
जपमाळेंत स्वप्नांच्या
    चित्रें तशींच नाजूक.

वडापिंपळा-तळाशीं
    तळें निश्चळ सावळें
अलगद उतरलें
    त्यांत नक्षत्र कोवळें

उंच पहाड हिरवा
    चरे कळप गुरांचा
मिठीमधें कोकरू अन्
    गूढ नाद घुंगरांचा

किती दालनें दालनें
    वर सौध चांदण्याचा
दूर तिथून दिसतो
    उंच कळस सोन्याचा

सारें अनोखें अनोखें
    केव्हां कधीं न पाहिलें
कसें माझ्या जिवापाशीं
    असें येऊन भिडलें

कुणीं दिलें हे आकार ?
    कुणीं भरले हे रंग ?
कोण असेल चितारी ?
    डोळां भरले तरंग.

## *डाळिंब*

घर कसें ?
घाटदार रसरशीत डाळिंबासारखें.
घरांतील माणसें कशीं ?
डाळिंबांतील रसाळ रंगदार दाण्यांसारखीं.
मी कशी ?
डाळिंबांतील बीं सारखी.
सर्वांत सामावलेली. सर्वांतून वेगळी.
अलिप्त, निर्भर
अलीशान सिनेमागृहांत बसल्यासारखी.

## *वाट थोडीशी उरली*

वाट थोडीशी उरली, जशी फुलोरी डहाळी
डोळां दाटला अंधार, वर झुलत राहिली
असें झुकतां झुकतां, फुलें निखळून आलीं
खालीं खोल अंधारांत, संथ संथ ओघळलीं
किती किती राहिलेलें, किती राहिलें अजून
किती किती राहिलेलें, नाहीं गेलें जें संपून.
तेंच काय ओघळलें, होऊनिया फूल फूल
नाहीं काळजाला डंख, नाहीं श्वासाला चाहूल
डोळां दाटला अंधार, झाला चांदणा चांदणा
वाट विमुक्त लावण्य, माझ्या मनांत मावेना.
गौराईच्या माहेराची, अशी वाट ही सजून
वारियाच्या पाकळीची, माझीं पावलें वरून.



## आमचे प्रकाशित काव्यसंग्रह

अभ्र

(महाराष्ट्र राज्य प्रथम पारितोषिक)

कृ. ब. निकुम्ब
जुने, प्रख्यात कवी
त्यांचा हा काव्यसंग्रह
त्यांच्या तजेलदार कवितेचाच
पुनरानुभव देतो.

त्यांच्या या संग्रहातील
बऱ्याच कविता
मुक्तछंदात आहेत.
तरीही
भावनेचा कधी कोमल,
हळुवार तर कधी
खिन्न बोचरा धागा

त्यांनी अलीकडच्या कवितेसारखा
कोठेही कर्कश केलेला नाही.

श्रेयसी

डॉ. पंडित आवळीकर हे कवी, संशोधक, समीक्षक
आणि रशियन वाङ्मयाचे अभ्यासक व अनुवादक

तीस वर्षे काव्यलेखन करणाऱ्या
आवळीकरांच्या काही कविता
संग्रहाच्या रूपाने 'श्रेयसी'मध्ये
प्रथमच एकत्र

या प्रदीर्घ कालखंडातील मराठी कवितेच्या
पार्श्वभूमीवर तांबे–बोरकरांचा वारसा चालविणाऱ्या
आवळीकरांचे श्रेय 'श्रेयसीमुळे' चोखंदळ व
निःपक्षपाती काव्यरसिकांच्या दृष्टीस भरेल.

विद्वत्व आणि कवित्व एकाचवेळी पेलणारा
हा दुरस्थ 'पंडित' कवी संशोधन, समीक्षा
आणि तौलनिक वाङ्मय
[Comparative Literature]
या क्षेत्रांबरोबरच काव्यप्रांतातही
केवढी मोलाची भर टाकत आहे
हा विचार कोणाही वाङ्मयाभ्यासकाला
निश्चित सुखद वाटेल.

चार तंतू

कन्नड कवी डॉ. द. रा. बेन्द्रे यांच्या
' नाकु तंती ' या ज्ञानपीठ पुरस्कार
कानडी कविता संग्रहाचा मराठी अनुवाद
कवी बेन्द्रे यांचे तरुण मित्र, बेळगावचे
श्री. व्यं. ल. जोशी यांनी केलेला आहे.

संग्रहांतील काव्याचे स्वरूप समिश्र आहे,
बेन्द्रे यांच्या प्रतिभेचा प्रसिध्द आवेग,
बेन्द्रे पद्धतीचा आशयसमृद्ध कल्पनाविष्कार,
जीवनाचे मूलतत्त्व स्पर्शून काव्यविषय
फुलविण्याचा त्यांचा वेध
साभिप्राय पद्धतीने वापरलेला पौराणिक संदर्भ,
निरनिराळ्या आकड्यांना दिलेला
विशेष प्रतिभाआशय इत्यादी बेन्द्रे कवितांची
सर्व वैशिष्टचे याही संग्रहात दिसून येतील.

बेदसूरींच्या स्पंदनाशी इमान राखून
विसाव्या शतकाच्या वर्तमानाचे भान
कुठेही हरवू न देता
बेन्द्रे यांची परतत्त्वस्पर्शी आधुनिक कविता
महाराष्ट्र कर्नाटकाच्या सीमारेषेवर
अशी उमलत राहिली आहे.
' चार तंतू ' हा अनुवाद मराठी रसिकांनी
बेन्द्रे यांच्या मंत्रमय विश्वाशी
आणखी समीप नेईल असा विश्वास वाटतो.

चित्रसेन शबाब यांची कविता दृष्टीच्या पलिकडल्या आठवणींचा 'पॉझ्' घेत निसर्गातील रंगविभोर ओळखी-नोंळखीच्या वाटेने पुढे पुढे जाते आणि ती नेहमीच एकटी असते. वेदनांची विलक्षण लय तिच्या वळणांना आहे. पानों-पानी वसंत, पण फुलांना फुलल्याची शिशिरशीळ...हरवलेल्या क्षणांची ही लोकविलक्षण वस्ती...आठवणींना शेवटही नसतात. असतात फक्त पराधीन अस्तित्वाचे पदर...डोळयांच्या कंठांनी आठवणी झिरपतात सगळया.

निसर्गातील रंग आणि गंधांच्या कोंदणात बसविलेल्या आठवणीचे 'कोलाज' आणि अशाच चित्रमाध्यमाच्या प्रतिमांतून व्यक्त होणारी वेदना ही श्री. शबाब यांच्या कवितेची अनोखी वैशिष्ठये.

उभ्या रानाला हिरवंगार कांकण, हिरव्यागार हवेत फुटत जाणारी चुकलेल्या क्षणांची एकेक फांदी, देठावर येणारी रानात शिंपडलेली लाल-चुटुक फुलं, कान टवकारून उभे ऊन, वेदनांचे वेरुळ, फेस्कोची तादात्म्य गाणी, गुहाकारांतून फोफावलेले सावल्यांचे उतार वाहणारे रस्ते, पॅलेटवर रंगांचे सात ठिपके अशा संमिश्र प्रतिमा आणि विविध लयींचे केलेले प्रयोग यांमधून रंगानुभूतींचे अस्तित्व काळकल्लोळातून स्थिर करताना हे 'पॉझ्' मराठी कवितेत आगळेच कुतुहल निर्माण करते.

REFBK-0023565
REFBK-0023565
२७५६
२३५६५
काव्य ४७७८
शाखा (स्थळ प्रत)